


१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

**उद्या अंक नाही!**

दिवाळी पाडव्यानिमित्त मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी कृषीवल कार्यालयाला सुट्टी असल्याने बुधवार, दि. ११ नोव्हेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची सर्व वाचक, वितरक, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

– मुख्य संपादक

रायगड | मंगळवार । दि. १० नोव्हेंबर २०२६ । अंक १५५ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ | । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


# 'गोकुळ'चा 'संघर्ष' पेटला

## आजच होणार अध्यक्षपदाची निवडणूक

**राज्याचं लक्ष लागलेल्या कोल्हापुरातील गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाची निवडणूक मंगळवारी (दि. १०) होणार आहे. यामध्ये निवडून आलेल्या २५ सदस्यांसोबतच शासनाने नियुक्त केलेले चार संचालकही मतदान करणार आहेत. मात्र, या चार संचालकांची मतं बाजूला ठेवली जाणार आहेत. याबाबतचे आदेश औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत. राज्य सरकारने काढलेला अध्यादेश चुकीचा की बरोबर हे अद्याप ठरलं नाही. याबाबत २५ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे.**

**■ सरकारविरोधात कोल्हापुरात जनसागर उसळला**

**■ जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा**

**■ दिग्गज नेत्यांची उपस्थिती**






। कोल्हापूर । प्रतिनिधी ।

कोल्हापुरच्या गोकुळ दूध संघात शासन नियुक्त संचालक नेमण्याच्या निर्णयावरुन राजकारण चांगलेच तापले असून, या निर्णयाला विरोध दर्शवण्यासाठी सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारविरोधात सोमवारी (दि. ९) जिल्हाधिकारी कार्यालयावर हजारोंचा विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चानंतर झालेल्या जाहीर सभेत उपस्थितांनी सताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. गोकुळच्या कारभारात हस्तक्षेप करून लोकशाही प्रक्रियेला बाधा आणली जात असल्याचा आरोप करत मोर्चेकऱ्यांनी सरकारविरोधात निषेध व्यक्त केला. या संघर्ष मोर्चामुळे कोल्हापुरातील राजकारण टोकाला पोहोचले असून, महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना गोकुळच्या निमित्ताने ऐन सणासुदीत पेटला आहे. •➤पान २ वर

## 1 तुम्ही सुरुवात केली, आम्ही शेवट करणार : सतेज पाटील



गोकुळ दूध संघाच्या प्रश्नावरून सुरू झालेल्या संघर्षात आता सतेज पाटील यांनी आक्रमक भूमिका घेत सत्ताधाऱ्यांना थेट आव्हान दिले आहे. ''तुम्ही सुरुवात केली, आम्ही शेवट करणार,'' असा इशारा देत त्यांनी आगामी काळात संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. ''तुम्ही आमची कळ काढली, आम्ही कळ काढली नव्हती. तुम्ही सुरुवात केली, आम्ही समाप्त करणार. याचना नही अब रण होगा, रण ऐसा होगा फिर कभी जैसा नही होगा,'' अशा शब्दांत पाटील यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. गोकुळच्या प्रश्नावर संपूर्ण महाराष्ट्रातून पाठिंबा मिळत असून, हा लढा केवळ एका दूध संघापुरता मर्यादित नसून, न्यायासाठी असल्याचे त्यांनी सांगितले. गोकुळच्या मुद्द्यामुळे सामान्य माणसालाही संघर्षातून विजय मिळू शकतो, हा विश्वास निर्माण झाला आहे, असे ते म्हणाले. कोल्हापुरातून २०२९ मध्ये राज्यातील सत्तापरिवर्तनाची बीजे रोवली गेली असल्याचा दावाही त्यांनी केला. गोकुळमधील •➤पान २ वर

## 2 लोकशाहीच्या नावाने मनमानी : जयंत पाटील



महाराष्ट्रात आज लोकशाही जिवंत राहिली आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. संविधानात तरतूद नसताना सत्तेच्या जोरावर मनमानी निर्णय घेतले जात आहेत. गोकुळमध्ये बहुमत नसतानाही स्वीकृत संचालक नियुक्त करून त्यांना मतदानाचा अधिकार देण्याचा प्रकार म्हणजे लोकशाहीच्या तत्त्वांची पायमल्ली आहे, असा घणाघाती आरोप शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केला. ते म्हणाले की हा नवा पायंडा सहकार क्षेत्रासाठी घातक आहे. कोल्हापुरात या निर्णयाविरोधात हजारो नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. जनतेच्या मनातील हा असंतोष सरकारने गांभीर्याने घेतला नाही, तर तो अधिक तीव्र होईल. हा केवळ एका संस्थेचा किंवा पक्षाचा प्रश्न नाही, तर लोकशाही आणि संविधान वाचविण्याचा लढा आहे. त्यामुळे सर्व समविचारी पक्षांनी मतभेद बाजूला ठेवून एकत्र येण्याची आणि अन्यायाविरोधात निर्णायक भूमिका घेण्याची वेळ आली आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

## 3 होत नसेल तर टेस्ट ट्युब बेबी : जयंत पाटील



सत्ताधारी पक्षाला त्यांचे बारा आत गेले, की काय करतील याची खात्री नाही म्हणून ते पाठवत नाहीत. परंतु, लोकशाहीमध्ये असे करणे बरे नाही, रेटारेटी करणे योग्य नाही. टेस्ट ट्युब बेबीचा कधी वापर करतात? जर होत नसल्यावर टेस्ट ट्युब बेबीची वेळ येते ना. माझी सरकारला विनंती आहे की ही टेस्ट ट्युब बेबी मागे घ्यावी. हा अध्यादेश मागे घ्यावा, असेही राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यावेळी म्हणाले. गोकूळ दूध संघात सत्ताधारी पॅनलचा पराभव होऊनही आता चार स्वीकृत संचालक नेमून त्यांना मतदानाचा अधिकार देण्याचे पाप केले जात आहे. पूर्वी दोन तज्ज्ञ स्वीकृत संचालक निवडून देण्याचा शिरस्ता होता. हॉलमध्ये गर्दी होऊ नये म्हणून ही पद्धत होती. परंतु, सतेज पाटलांचे बहुमत मोडून काढण्यासाठी चार स्वीकृत संचालक नेमले गेले आणि त्यांना मतदानाचा अधिकार देण्याचे पाप सरकारकडून करण्याचे काम करण्यात आल्याची टीकाही जयंत पाटील यांनी यावेळी केली.

## 4 येताना चालत येतील, पण जाताना... : राजू शेट्टी



गोकुळमध्ये शासन नियुक्त संचालकांच्या नियुक्तीवर आक्षेप घेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी राज्य सरकार, महायुती आणि भाजपवर जोरदार निशाणा साधला. उद्या होणाऱ्या अध्यक्ष निवड सभेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आक्रमक भूमिका घेत शासन नियुक्त संचालकांना थेट इशारा दिला आहे. शासन नियुक्त संचालक उद्याच्या अध्यक्ष निवडीच्या सभेला आले तर ते आत येतील. मात्र, बाहेर जाऊ शकणार नाहीत. येताना चालत येतील, पण जाताना खांद्यावरून जातील, असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला. उद्या गोकुळ कार्यालयावर घेराव घालायचा का, असा सवाल करत त्यांनी कार्यकर्त्यांना आंदोलनासाठी सज्ज राहण्याचे आवाहनही केले. महायुतीचे नेते आपली माणसे आणि कार्यकर्ते आणणार असल्याची माहिती मिळाल्याचे सांगत, तुम्ही तुमचे लोक आणा, आम्हीही आमची माणसे आणतो. एकदा काय ते होऊन जाऊ दे, असे आव्हान त्यांनी दिले.

## 5 गोकुळची सत्ता मागच्या दाराने बळकावण्याचा डाव : विश्वजित कदम



गोकुळच्या निवडणुकीत दूध उत्पादकांनी दिलेला कौल महायुती सरकारने स्वीकारायला हवा होता. मात्र, हुकूमशाही पद्धतीने आणि मागच्या दाराने गोकुळची सत्ता बळकावण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा घणाघात आमदार विश्वजित कदम यांनी केला. गोकुळच्या संचालकांमधूनच अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडले गेले पाहिजेत. सरकारने अध्यादेश काढून शासकीय संचालक नेमण्याचा डाव आखल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सवाल करताना, गोकुळचा विषय कोल्हापूरचा असेल तर न्यायालयीन लढ्यासाठी दिल्लीचा वकील कशाला आणला, असा टोला त्यांनी लगावला. निकाल काहीही लागो, कोल्हापूरची जनता बंटी पाटलांच्या पाठीशी आहे. सांगलीची जनताही तुमच्यासोबत आहे. लोकसभा निवडणुकीत मी कंडका पाडला, आता तुम्ही कंडका पाडा, असे आवाहन करत त्यांनी सत्ताधाऱ्यांना इशारा दिला. ''खटक्यावर बोट, जागेवर पलटी,'' या घोषणेने त्यांनी भाषणाचा समारोप केला.

## 6 विरोधकांना रस्त्यावर फिरू देणार नाही : खासदार धैर्यशील मोहिते-पाटील



गोकुळच्या सत्तासंघर्षात सतेज पाटील यांच्या विरोधात राजकीय खेळी करणाऱ्यांना आता रस्त्यावर फिरणेही कठीण करू, असा थेट इशारा माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी दिला. ''विरोधकांना रस्त्यावर फिरू देणार नाही,'' असे ठणकावत त्यांनी महायुती सरकारला आव्हान दिले. त्यांच्या या आक्रमक इशाऱ्याने संघर्ष मोर्चात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील मोर्चात बोलताना मोहिते-पाटील म्हणाले, बंटी पाटील माझ्या तालुक्याचे जावई आहेत. त्यामुळे मला येथे यावेच लागणार. माझ्या अंगात थोडे रक्त कोल्हापूरचेही आहे. सोलापूरसह अख्खा महाराष्ट्र बंटी पाटलांच्या पाठीशी असून, माझाही या लढ्याला पाठिंबा आहे. गोकुळच्या सत्तासंघर्षात सतेज पाटील यांना एकटे समजू नका, असा संदेश पाटील यांनी विरोधकांना दिला. यावेळी सरकारच्या हुकूमशाही कारभाराचा जोरदार समाचार घेतला.

## 7 गोकुळला चोरमन नको, चेअरमन हवा : विवेकानंद पाटील



शेतकऱ्यांच्या कष्टावर उभ्या राहिलेल्या गोकुळची सत्ता मागच्या दाराने बळकावण्याचा प्रयत्न खपवून घेणार नाही. गोकुळला चोरमन नको, तर लोकांनी निवडून दिलेला चेअरमन हवा, अशा शब्दांत विवेकानंद पाटील यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. ''गोकुळात नंदाच्या घरी कृष्ण वाढतो आणि मंत्रालयात कंस मामा बोटं मोडितो,'' असा टोला लगावत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना म्हशींच्या दुधावरून सुनावले. आमच्या म्हशी गोकुळची सत्ता तुम्हाला मिळावी म्हणून फळत नाहीत; त्या त्यांच्या धन्याला दूध मिळावे म्हणून फळतात, असेही ते म्हणाले. सकाळी अंधारात उठून आमच्या महिला दूध काढतात, शेण-घाण काढून त्यांचे हात कुजतात. नामनिर्देशित संचालकांच्या घरातील महिलांना धार काढताना दाखवा, असे आव्हान देत त्यांनी तज्ज्ञ संचालकांची तुलना 'फुकटच्या म्हशीमागे रेडकू' अशी केली.

## दिवाळीत आगीचे तांडव; देशभरात २३ जणांचा मृत्यू

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

दिवाळीच्या उत्सवादरम्यान फटाके आणि शॉर्टसर्किटमुळे देशभरात आगीच्या अनेक दुर्घटना घडल्या. या घटनांमध्ये २३ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. मध्य प्रदेशात सर्वाधिक १३, तर महाराष्ट्रात ६ जणांना जीव गमवावा लागला.

मध्य प्रदेशातील कटनी येथे एकाच कुटुंबातील सहा जणांचा, तर सिवनी येथेही सहा जणांचा आगीत मृत्यू झाला. उज्जैनमध्ये १०७ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला. महाराष्ट्रातील धाराशिव येथे एकाच कुटुंबातील सहा जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला. पुण्यात एका रात्रीत आगीच्या सुमारे ६३ घटना घडल्या.

## फटाक्याच्या ठिणगीने संसाराची राखरांगोळी



। पेण । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या फटाक्याची एक ठिणगी पेणमधील तीन मजल्यांवरील रहिवाशांच्या संसारांची राखरांगोळी करून गेली. उत्कर्ष नगर येथील सिद्धिविनायक इमारतीला लागलेल्या आगीत तीन फ्लॅटचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी टळली; मात्र अग्निशमन दलाच्या वाहनाला इमारतीपर्यंत पोहोचताना येणारे अडथळे आणि बांधकाम परवानग्यांचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

८ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे ९.१५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. •➤पान २ वर

## २४ तासांत आगीच्या २८ घटना

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिका हद्दीसह परिसरात गेल्या २४ तासांत आगीच्या तब्बल २८ घटनांची नोंद झाली आहे. पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत विविध ठिकाणांहून आगीबाबतचे कॉल प्राप्त झाले. या घटनांमध्ये कचरा, गवत, झाडे तसेच इमारती आणि इतर ठिकाणी आग लागल्याच्या प्रकारांचा समावेश आहे. सुदैवाने या सर्व घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती अग्निशमन दलाने दिली.या घटनांमध्ये कचरा, गवत, झाडे आणि डोंगराला आग लागण्याच्या प्रकारांचा •➤पान २ वर







# ‘रिलायन्स’साठी झाडांची कत्तल सुरूच

## ■ नागोठणे-शिहू मार्गावर झाडांच्या फांद्या कापल्या; स्थानिक नागरिकांतून तीव्र संताप

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

अंबानी समूहाच्या नागोठणे परिसरात असलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या विस्तारित प्रकल्पाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी रिलायन्स कंपनीच्या आतील भागात असलेल्या शेकडो झाडांची कत्तल केल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून परिसरातील नागरिकांतून सुरू आहे.

असे असतानाच नागोठणे-शिहू-पोयनाड मार्गालगत असलेल्या झाडांच्या फांद्या छाटण्याचे काम रिलायन्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून



(छायाचित्र : महेश पवार)

दिवसाढवळ्या सुरू आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या नागोठणे प्रकल्पाला लागूनच असलेल्या नागोठणे-पोयनाड मार्गावरील नागोठण्याहून शिहू बाजूकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूला आणि कडसुरे ते कुहीरे गावांच्या दरम्यान रस्त्यालगत असलेली आणि उंचच उंच वाढलेल्या महाकाय वृक्षांच्या मोठमोठ्या फांद्या तोडण्याचे काम शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर रोजी भरदिवसा सुरू होते. यासाठी रिलायन्स कंपनीचे अधिकारी, कंत्राटी कामगार तसेच सुरक्षारक्षक अशी पंधरा ते वीस जणांची टीम तैनात करण्यात आली होती. झाडे तोडण्यासाठी रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या उंच मशीनमध्ये एक व्यक्ती हातात कटर घेऊन रस्त्यालगतच्या मोठमोठ्या फांद्या कटरच्या सहाय्याने कापत असल्याचे यावेळी दिसून आले.

यासंदर्भात रिलायन्स कंपनीच्या उपस्थित अधिकाऱ्यांशी प्रस्तुत प्रतिनिधीने चौकशी केली असता कंपनीच्या विस्तारित प्रकल्पासाठी मोठी यंत्रे येणार असल्याने या यंत्रांना अडथळा नको म्हणून झाडांच्या फांद्या कापण्यात येत असल्याची माहिती त्यांच्याकडून देण्यात आली. मात्र, झाडांच्या फांद्या कापण्याच्या कामाची वन खात्याची आवश्यक परवानगी आहे का, असा प्रश्न उपस्थित केल्यानंतर रिलायन्सचे अधिकारी निरुत्तर झाले. त्यामुळे वनखात्याचा यांना आशीर्वाद आहे का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. तसेच यामुळे प्रकल्प उभारणीच्या कामात रिलायन्स प्रशासनाची मनमानी सुरूच असल्याचे वारंवार दिसून येत आहे.

# मुंबई-ठाण्यात रॉकेट फटाक्यांवर बंदी

**| मुंबई | प्रतिनिधी |**

■ ठाणे जिल्हाधिकाऱ्यांचा दोन महिन्यांसाठी आदेश

■ नियम मोडल्यास कठोर कारवाई

दिवाळीतील फटाक्यांच्या आतषबाजीमुळे आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. ठाणे जिल्ह्यात रॉकेट आणि हवेत उडणाऱ्या तत्सम फटाक्यांच्या वापरावर ९ नोव्हेंबर २०२६ ते ८ जानेवारी २०२७ या कालावधीत बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी याबाबत आदेश जारी केले आहेत. मुंबईतही अशाच प्रकारची बंदी लागू करण्याच्या हालचाली सुरू आहेत.

ठाणे जिल्ह्यात आतापर्यंत ११ ठिकाणी आगीच्या घटना घडल्या असून, सार्वजनिक आणि खासगी मालमत्तेचे नुकसान झाले आहे. रॉकेटचे जळते अवशेष इमारती, खिडक्या आणि ज्वलनशील वस्तूंवर पडून आग लागण्याचा धोका असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्याच्या संपूर्ण महसुली हद्दीत सार्वजनिक व खासगी जागा, इमारतींच्या गच्च्या, बाल्कनी आणि निवासी परिसरात हे निर्बंध लागू राहतील. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५१ आणि ६० नुसार कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, ठाण्यातील रहेजा कार्लाइन या १७ मजली इमारतीला लागलेल्या आगीत ५० रहिवासी अडकले होते. अग्निशमन दलाने सर्वांची सुखरूप सुटका केली.

दुसरीकडे, वसई-विरारमध्ये ८ नोव्हेंबरपासून ९ नोव्हेंबरच्या पहाटेपर्यंत २४ ठिकाणी आगीच्या घटना घडल्या. यात दोघे किरकोळ भाजले. नालासोपारा-विरारदरम्यान भूमिगत रेल्वे केबलला आग लागल्याने पश्चिम रेल्वेच्या लोकल सेवेलाही फटका बसला.

## १९ गावांच्या हद्दवाढीचे स्वागत

■ करंजाडे नोडचाही महापालिकेत समावेश करा

■ ग्रामस्थांसह सिडको वसाहतीतील नागरिकांची मागणी

**पनवेल :** महानगरपालिकेच्या हद्दीत १९ गावांचा समावेश करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर नागरिकांमध्ये विकासाच्या अपेक्षा वाढल्या आहेत. गावांचा महापालिकेत समावेश झाल्यास नागरी सुविधांना चालना मिळेल, अशी आशा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. त्याचबरोबर सिडकोने विकसित केलेल्या करंजाडे नोडचाही महानगरपालिकेत समावेश करावा, अशी मागणी करंजाडे नोड प्लॉट ओनर वेल्फेअर असोसिएशन वतीने करण्यात आली आहे. हद्दवाढीमुळे विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, केवळ ग्रामीण भागच नव्हे तर सिडकोने विकसित केलेल्या वसाहतींमधील नागरिकांनाही नागरी सुविधांचे प्रश्न भेडसावत आहेत. करंजाडे नोडमध्ये पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, मलनिस्सारण व्यवस्था, उद्याने, पदपथ, वृक्षारोपण, पथदिवे आणि सार्वजनिक परिवहन अशा सुविधांची गरज अधिक तीव्र झाली आहे.

> “करंजाडे नोडमध्ये सिडकोने शहर विकसित केले असले तरी वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत नागरिकांना आवश्यक त्या नागरी सुविधा मिळत नाहीत. पाणी, रस्ते, मलनिस्सारण, उद्याने, पदपथ, वृक्षारोपण, पथदिवे आणि सार्वजनिक परिवहन या सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. करंजाडे नोडचा पनवेल महानगरपालिकेत समावेश झाल्यास येथील अनेक प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल. त्यामुळे करंजाडेचा महापालिकेत लवकरात लवकर समावेश करावा, अशी आमची ठाम मागणी आहे.
> – चंद्रकांत गुजर
> अध्यक्ष, करंजाडे नोड प्लॉट ओनर वेल्फेअर असोसिएशन

## लोणेरे विद्यापीठाची ३५ वर्षांची संघर्षगाथा

■ न्यायालयीन लढे, अपुऱ्या सुविधा

■ शासनाच्या आश्वासनांवरच शैक्षणिक स्वप्नांची भिस्त

**| माणगाव | प्रतिनिधी |**

निसर्गाने भरभरून दिलेल्या कोकणाच्या वाट्याला विकासासाठी मात्र संघर्षच आला आहे. उच्च शिक्षणासारख्या मूलभूत क्षेत्रातही शासनाच्या उदासीनतेचा फटका बसत असेल, तर कोकणाच्या विकासाचे दावे नेमके कशासाठी? माणगाव तालुक्यातील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची अवस्था ही त्याचीच साक्ष देत आहे. न्यायालयीन लढा, अपुऱ्या सुविधा, प्रशासकीय अडचणी आणि वर्षानुवर्षे मिळणारी आश्वासने यामध्ये कोकणातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक स्वप्न अडकले आहे.

माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या दूरदृष्टीतून कोकणात तंत्रशिक्षणाचे स्वतंत्र विद्यापीठ उभारण्याची संकल्पना पुढे आली. २४ एप्रिल १९८२ रोजी नियोजन समिती स्थापन झाली, तर ६ मे १९८९ रोजी विद्यापीठाचा कायदा मंजूर झाला. लोणेरे-अंबारले परिसरातील सुमारे




१,५०० एकर जागेवर भव्य शैक्षणिक संकुल उभारण्याचे स्वप्न होते. मात्र प्रत्यक्षात केवळ सुमारे ५०० एकर जमीन संपादित झाली. शिक्षक, प्रयोगशाळा, वसतिगृहे, प्रशासकीय पदे आणि आर्थिक तरतुदींच्या अभावामुळे विद्यापीठाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या परिस्थितीविरोधात माणगावचे डॉ. मोहन दोसी यांनी संघर्ष उभारला. २१ मार्च १९९१ रोजी विद्यार्थ्यांचा विधानसभेवर मोर्चा काढण्यात आला. शासनाकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली. ॲड. सी.जी. गावनेकर यांनी न्यायालयात बाजू मांडली. न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर कुलगुरू नियुक्ती, आर्थिक तरतूद आणि प्रशासकीय पदांच्या प्रश्नांना गती मिळाली. १ जानेवारी १९९२ रोजी प्रा. वीरा देशपांडे यांची पहिल्या कुलगुरूपदी नियुक्ती झाली. एका विद्यापीठाला सक्षम करण्यासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागणे, हीच कोकण विकासाची शोकांतिका आहे.

२०१६ मध्ये तत्कालीन राज्यपाल डॉ. विद्यासागर राव यांच्याकडेही पाठपुरावा करण्यात आला. आज सुमारे २५५ अभियांत्रिकी आणि फार्मसी महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्न असल्याचे सांगितले जाते. मात्र नियमित नियुक्त्या, प्रशासकीय स्थैर्य आणि पुरेशा आर्थिक तरतुदींचे प्रश्न कायम असल्याच्या तक्रारी आहेत. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी डिसेंबर २०२६ पर्यंत प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आता आश्वासन प्रत्यक्षात उतरणार की पुन्हा कोकणवासियांच्या पदरी निराशाच पडणार, हा प्रश्न आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गौरव अरुण शेठ यांचेकडून कायम विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतींची मालकी निर्वेध असल्याबाबतचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरुन आमचे अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील (१) नगर भुमापन क्रमांक/CTS No. १/६ ब + १/१/२ अ क्षेत्र ७७०.८० चौ. मी. (२) नगर भूमापन क्रमांक/CTS No.१/६ ब १/१अ१/२/३ क्षेत्र २३०.०० चौ.मी. या मिळकती या जाहिर नोटीशीचा विषय आहे.

वर नमूद मिळकतीमध्ये कुठल्याही व्यक्ती/व्यक्तींचा, कंपनीचा, भागिदारी संस्था, वित्तीय महामंडळ, पतसंस्था इत्यादी कोणाचाही हक्क, हिस्सा, दावा, हरकत, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, परस्पर सामंजस्याचा करार, लिज, लियन, चार्ज, कौटुंबिक व्यवस्था, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, करार, हुकुमनामा, वारसाहक्क, अदलाबदल दस्त, हक्कसोड पत्र, बोजा, हरवलेल्या दस्तांमार्फत, ताबा कब्जा दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहेत असे समजून मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. ०९/११/२०२६.

**ॲड. संपदा मनोज पाटील**
शॉप नं.११, भास्कर को.ऑप.हौसि.सोसा.,
रामनाथ रोड, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड.
मो. ९२२५५६६०४३.

दि. /११/२०२६

**जाहिर नोटिस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचा बोलणी विद्यमान मालक सुभाष गणपत म्हात्रे, वगैरे ८ यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| तळाशेत, ता.अलिबाग | १५४ | क्षेत्र ०-९०-००<br>पो.ख.०-२०-००<br>एकुण १-१०-०० | १.२५ |

वर नमुद केलेल्या मिळकतीपैकी ०-२०-१० हे.आर. क्षेत्राची मिळकत ही या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी (पळी आंबेघर) पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं.९२७३२७३८४३/९६३७२७००१९

पान १ वरुन



### ‘गोकुळ’ चा ‘संघर्ष’ पेटला

या मोर्चात खासदार शाहू छत्रपती, माजी मंत्री जयंत पाटील, विश्वजित कदम, खासदार विशाल पाटील, धैर्यशील मोहिते-पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस मा. आमदार जयंत पाटील, मालोजीराजे, ऋतुराज पाटील, राजीव आवळे आणि विद्यार्थी नेता विवेकानंद पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### तुम्ही सुरुवात केली, आम्ही शेवट करणार! : सतेज पाटील

चार संचालकांच्या नियुक्तीवरून मंत्री हसन मुश्रीफ आणि चंद्रकांत पाटील यांच्यावर टीका करत लोकशाही संपविण्याचे षड्यंत्र रचल्याचा आरोप त्यांनी केला. सत्तेचा गैरवापर करून जर गोकुळवर डल्ला मारण्याचा प्रयत्न केला, तर हा लढा आता केवळ कोल्हापूरपुरता मर्यादित राहणार नाही. तुम्ही आमची नको तिथे कळ काढली आहे, आता आम्ही गप्प बसणार नाही आणि सोडणारही नाही, असा इशारा पाटील यांनी दिला. शाहू महाराजांच्या भूमीत सहकाराचा कायदा पायदळी तुडवणाऱ्या सत्ताधाऱ्यांना कोल्हापूरची जनता कधीही माफ करणार नाही, असा इशाराही सतेज पाटील यांनी दिला.

### २४ तासांत आगीच्या २८ घटना

समावेश आहे. पनवेलमधील पुष्पकनगर येथे डोंगराला आग लागली. साईनगर येथील साई डेव्हलपर्स, कामठी हाऊस इमारत आणि इतर ठिकाणीही अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. कळंबोली केंद्राच्या हद्दीत रोडपाली सेक्टर २० येथे कचरा आणि गवताला आग लागण्याच्या घटना घडल्या. कामोठे सेक्टर ३६, तळोजा फेज एक, मेट्रो डेपो परिसर, खुटारी गाव आणि नांबचे गाव येथील गोदामाला लागलेल्या आगीचाही अहवालात समावेश आहे.कामोठे परिसरात विविध सोसायट्या आणि कॉम्प्लेक्समध्ये सात वेळा अग्निशमन दलाला धाव घ्यावी लागली. नवीन पनवेलमध्ये दिल्ली विची परिसरात कचऱ्याला, तर शांती कॉलनी सेक्टर पाच येथे झाडाला आग लागली. दरम्यान, साई पॅकिंग येथे तळोजा औद्योगिक क्षेत्राच्या हद्दीबाहेर लागलेल्या आगीची प्रमुख घटना म्हणून स्वतंत्र नोंद करण्यात आली आहे. अग्निशमन दलाच्या अहवालानुसार, एकूण २८ कॉलपैकी २७ किरकोळ स्वरूपाचे, तर एक प्रमुख स्वरूपाचा होता. २४ तासांत आगीच्या घटनांची ही संख्या लक्षवेधी ठरली आहे. सुदैवाने सर्व घटनांमध्ये जीवितहानी शून्य असल्याने मोठा अनर्थ टळला.

**तळोज्यातील साई पॅकिंगला आग**

पनवेल अग्निशमन दलाच्या २४ तासांच्या अहवालात तळोजा औद्योगिक क्षेत्राच्या हद्दीबाहेरील साई पॅकिंग येथे लागलेल्या आगीची प्रमुख घटना म्हणून नोंद करण्यात आली आहे. ८ नोव्हेंबर सकाळी ८ ते ९ नोव्हेंबर सकाळी ८ या कालावधीत घडलेल्या एकूण २८ अग्निशमन कॉलपैकी ही एकमेव प्रमुख स्वरूपाची घटना होती. उर्वरित २७ घटना किरकोळ स्वरूपाच्या होत्या. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याची माहिती अग्निशमन दलाच्या अहवालात देण्यात आली आहे.

### फटाक्याच्या ठिणगीने संसाराची राख

दिवाळीनिमित्त उडविण्यात आलेला फटाका चौथ्या मजल्यावरील श्री. प्रेम तेलवणे यांच्या फ्लॅटमध्ये पडल्याने आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. आगीची झळ पाचव्या मजल्यावरील श्री. विजय प्रसाद यांच्या फ्लॅटला, तर सहाव्या मजल्यावरील श्री. अमित विठोबा निंगावले यांच्या फ्लॅटच्या किचनलाही बसली. घरातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच पेण अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र, या घटनेदरम्यान अग्निशमन वाहनाला इमारतीपर्यंत पोहोचण्यासाठी अडथळे निर्माण झाल्याची चर्चा आहे. परिसरात अतिक्रमण असल्याने अग्निशमन वाहनासाठी पुरेसा मोकळा रस्ता उपलब्ध आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरात टोलेजंग इमारती उभ्या राहात असताना आपत्कालीन प्रवेशमार्ग, अग्निसुरक्षा आणि आवश्यक मोकळ्या जागांची प्रत्यक्षात पूर्तता होते का, याची तपासणी कोण करणार, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. सिद्धिविनायक इमारतीच्या बांधकाम परवानगीची आणि प्रत्यक्ष बांधकामाची चौकशी करण्याची मागणी होत आहे. संबंधित बिल्डरने मंजूर आराखड्यानुसार बांधकाम केले आहे का, अग्निशमन विभागाची आवश्यक मान्यता घेतली होती का, अग्निशमन वाहनासाठी प्रवेशमार्ग उपलब्ध ठेवला आहे का आणि परिसरातील अतिक्रमणाकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले का, याची सखोल तपासणी होणे गरजेचे आहे. या दुर्घटनेत अग्निशमन विभागाचे प्रमुख अभिजीत गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली चालक अभिषेक बंगाले, समीर म्हात्रे आणि अग्निशामक सागर वर्तक, सूरज भोईर, सूरज कुरुंगळे, परेश म्हात्रे, विशाल बांमणे, प्रसन्ना पाटील, चंद्रकांत गावंड आणि स्वप्निल म्हात्रे यांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न केले. तर पोलीस विभागाकडून झडख विक्रम नवरखेडे, झडख शिल्पा वेंगुर्लेकर, पोलीस कॉन्स्टेबल नवीन पाटील, चंद्रकांत दणाने आणि होमगार्ड जितेंद्र पानसकर यांनी आवश्यक कार्यवाही केली.

# शुद्ध पाण्याचा पहारेकरीच मनुष्यबळाविना!

■ चार तालुक्यांचा भार दोन कर्मचाऱ्यांवर

■ पाच ग्रामपंचायतींमध्ये जलशुद्धीकरणाचा प्रश्न कायम

**| माणगाव | प्रतिनिधी |**

ग्रामीण जनतेच्या आरोग्याची जबाबदारी असलेल्या पाणी तपासणी प्रयोगशाळेचीच अवस्था बिकट झाली आहे. चार तालुक्यांतील पाण्याच्या शुद्धतेवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी माणगावच्या प्रयोगशाळेवर असताना केवळ दोन कर्मचारी कार्यरत आहेत. दोन पदे रिक्त असल्याने तपासणी यंत्रणेवर कामाचा ताण वाढला आहे. दुसरीकडे माणगाव तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींमध्ये नियमित पाणीशुद्धीकरणाची व्यवस्था नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत माणगाव येथे उपविभागीय पाणी तपासणी प्रयोगशाळा कार्यरत असून माणगाव, म्हसळा, तळा आणि श्रीवर्धन या चार तालुक्यांतील पाण्याचे नमुने येथे तपासले जातात. माणगाव तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतींपैकी ६९ ग्राम पंचायतींमध्ये क्लोरीन लिक्विडच्या माध्यमातून पाणी निर्जंतुक करून पुरवठा केला जातो. जलसुरक्षक दर तीन महिन्यांनी पाण्याचे नमुने गोळा करून प्रयोगशाळेत पाठवतात. या नमुन्यांची जैविक आणि रासायनिक तपासणी केली जाते. पीएच मूल्य, रासायनिक घटक तसेच पाण्यातील जिवाणूंची तपासणी करून पाणी पिण्यास योग्य आहे की नाही, हे निश्चित केले जाते. दर तीन महिन्यांत दोन हजारांहून अधिक रासायनिक आणि चार हजारांहून अधिक जैविक तपासण्या केल्या जातात. दूषित नमुने आढळल्यास संबंधित यंत्रणेला कळवून पुढील कार्यवाही केली जाते. तपासणीतील सुमारे ८० ते ९० टक्के नमुने शुद्धतेच्या निकषांत बसत असल्याची माहिती आहे.

मात्र, माणगाव नगरपंचायत आणि भिरा येथे जलशुद्धीकरण केंद्रांची व्यवस्था असून अन्य ६९ ग्रामपंचायतींमध्ये क्लोरीनद्वारे पाणी निर्जंतुक केले जाते. उर्वरित पाच ग्रामपंचायतींमध्ये नियमित जलशुद्धीकरणाची व्यवस्था नसल्याची माहिती समोर आली आहे. नैसर्गिक स्रोतांमधून थेट पाणीपुरवठा होत असल्याने या गावांमध्ये दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोका नाकारता येत नाही. विशेषतः पावसाळ्यात अतिसार, गॅस्ट्रो यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे या गावांमध्येही शुद्धीकरणाची व्यवस्था उभारणे आवश्यक आहे.

चार तालुक्यांतील पाण्याच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवणाऱ्या प्रयोगशाळेत दोन पदे रिक्त असणे ही गंभीर बाब आहे. लाखो नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित तपासण्यांचे काम मर्यादित कर्मचाऱ्यांवर सुरू आहे. माणगावमधील उपजिल्हा रुग्णालयात दररोज ३०० ते ४०० रुग्ण उपचारासाठी येतात. दूषित पाण्यामुळे आजार उद्भवू नयेत, यासाठी सक्षम तपासणी यंत्रणा असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रयोगशाळेतील रिक्त पदे तातडीने भरावीत, पाणीशुद्धीकरणापासून वंचित पाच ग्रामपंचायतींमध्ये योग्य व्यवस्था करावी आणि चारही तालुक्यांतील पाण्याच्या

**जाहीर निविदा सूचना**

**ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रुक, ता.रोहा.**

**निविदा सूचना** दिनांक :-०९/११/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रुक सन २०२५-२६ खालील विकास कामे १५ वा वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर निधीतून हाती घेतले आहे. सदर कामास ग्रामपंचायत मासिक सभा व ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिली असून अंदाजपत्रकात मा.कार्यकारी अभियंता, मा.उपअभियंता (बांधकाम) उपविभाग रोहा, मा. उपअभियंता ग्रा.पा.पु. (बांधकाम) उपविभाग रोहा यांनी तांत्रिक मंजुरी दिली असून सदर काम करणेसाठी नोंदणीकृत ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर संस्था यांजकडून टक्केवारी दराची लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा ०९/११/२०२६ ते १६/११/२०२६ मागवण्यात येत आहेत. सदर निविदा कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयात समक्ष सादर करावयाच्या आहेत.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म फी | ठेकेदार वर्ग | निविदा सदर करणेची अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १% इसारा रक्कम | कामपूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरेबुद्रुक येथे गटार बांधणे | ११५०००/- | २००/- | नोंदणीकृत | १६/११/२०२६ | सायं.५.०० वा.पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय आरेबुद्रुक | ११५०/- | २ महिने |
| २ | आरेखुर्द येथे गटार बांधणे | १००१२०/- | २००/- | नोंदणीकृत | १६/११/२०२६ | सायं. ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय आरेबुद्रुक | १००१/- | २ महिने |
| ३ | कुंभोशी येथे गटार बांधणे | ११५०००/- | २००/- | नोंदणीकृत | १६/११/२०२६ | सायं. ५.०० वा.पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय आरेबुद्रुक | ११५०/- | २ महिने |
| ४ | आरेबुद्रुक खातेलीवाडी येथे पाण्याची टाकी दुरुस्ती करणे | ६०००००/- | २००/- | नोंदणीकृत | १६/११/२०२६ | सायं. ५.०० वा.पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय आरेबुद्रुक | ६०० /- | २ महिने |
| ५ | प्राथमिक शाळा आरेखुर्द येथे पाण्याची सीनटेक्स टाकी बसविणे | ६०००००/- | २००/- | नोंदणीकृत | १६/११/२०२६ | सायं. ५.०० वा.पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय आरेबुद्रुक | ६००/- | २ महिने |
| ६ | रा.जि.प.शाळा कुंभोशी दुरुस्ती करणे, | ११००००/- | २००/- | नोंदणीकृत | १६/११/२०२६ | सायं. ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय आरेबुद्रुक | ११००/- | २ महिने |

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेस पहावयास मिळतील आवश्यक फी भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
२) प्राप्त निविदा दि. १७/११/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थितांचे समक्ष मा.सरपंच यांचे उघडण्यात येतील.
३) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्ट्रेशन दाखले हे सत्य प्रत केलेले असावे.
४) कोणताही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.
५) देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर व उपकरणाची कपात केली जाईल पंचायत समिती रोहा यांचे कडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीने अधिकारी सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखालील सदर काम करणे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
६) काम अंतिमरीत्या पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यानंतर देखभाल दुरुस्ती संबधित ठेकेदार यांनी करणेची असून त्यानंतर सुरक्षा अनामत परत केली जाईल.
७) कामाची बिले ग्रामपंचायत १५ वा वित्त योजना उपलब्ध निधी नुसार अदा करणेत येईल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशीर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
९) निविदा किंमत ना परतावा समजावी.
१० निविदा मंजूर केल्यास १००/- स्टम्प पेपरवर करारनामा स्वखर्चाने करून द्यावा लागेल.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रूक**
**ता. रोहा जि. रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रुक**
**ता. रोहा जि. रायगड**

**पोलादपूर नगरपंचायत, पोलादपूर**
**ता.पोलादपूर, जि. रायगड - ४०२३०३**

जा.क्र./ ६९१ दिनांक : ०४/११/२०२६

**जाहिर आवाहन**

**दिवाळी २०२६-सुरक्षित, स्वच्छ व प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करा**

पोलादपूर नगरपंचायतीमार्फत शहरातील सर्व नागरिक, फटाके विक्रेते व आयोजकांना आवाहन करण्यात येते की, दिवाळी सण साजरा करताना ध्वनी व वायुप्रदूषण टाळून नागरिकांची सुरक्षितता आणि पर्यावरणाचे संरक्षण करावे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक २२ सप्टेंबर २०१६ रोजीच्या निर्देशांचे पालन करावे.

१. सार्वजनिक रस्ते, पदपथ, चौक व इतर सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडू नयेत. सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२. रुग्णालये, शाळा, न्यायालये व शांतता क्षेत्रांजवळ फटाके फोडू नयेत. फटाक्यांच्या वापरासाठी लागू वेळा व ध्वनीमर्यादांचे पालन करावे.

३. प्रतिबंधित, बोरियमयुक्त किंवा नियमबाह्य फटाक्यांची खरेदी विक्री व वापर करू नये. फटाके विक्रेत्यांनी वैध परवान्यानुसारच अधिकृत ठिकाणी विक्री करावी.

४. फटाके पेटवताना सुरक्षित अंतर ठेवावे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण व पाळीव प्राण्यांची काळजी घ्यावी. ध्वनीक्षेपक वापरताना आवश्यक परवानगी व वेळेच्या अटी पाळाव्यात.

५. फटाक्यांचा कचरा रस्ते, नाले किंवा सार्वज

## निवडक

### प्रफुल्ल शिर्केची यशस्वी झेप

**माणगाव :** स्वप्नांना कष्टांची जोड, मनात जिद्द आणि कलेवर नितांत प्रेम असेल, तर गावाच्या मातीतूनही यशाची आंतरराष्ट्रीय शिखरे गाठता येतात, याचा प्रत्यय माणगाव तालुक्यातील प्रफुल्ल शिर्के यांच्या प्रवासातून येतो. वावे तर्फे निजामपूर या छोट्याशा गावात जन्मलेल्या प्रफुल्ल यांनी मनोरंजन क्षेत्रात गेल्या आठ वर्षांपासून सातत्याने काम करत अभिनय, कला दिग्दर्शन आणि चित्रपट निर्मिती क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कलाप्रवासाला आता 'पीएम्स वाईफ' या हिंदी फिचर फिल्मच्या माध्यमातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष ओळख मिळत आहे. प्रफुल्ल शिर्के यांनी रमा राघव, विठू माऊली आणि आशा यांसारख्या लोकप्रिय मालिकांमध्ये विविध भूमिका साकारल्या आहेत. छोट्या पडद्यावरील अभिनयासोबतच त्यांनी अनेक जाहिरातींच्या चित्रीकरणातही सहभाग घेतला आहे. मात्र, केवळ अभिनयापुरते मर्यादित न राहता त्यांनी कला दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही आपले कौशल्य सिद्ध केले. माणगाव तालुक्यातील एका छोट्याशा गावातून सुरू झालेला हा प्रवास आज आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांच्या व्यासपीठापर्यंत पोहोचला आहे. प्रफुल्ल यांचे यश हे केवळ त्यांच्या वैयक्तिक कर्तृत्वाचे प्रतीक नसून, ग्रामीण भागातील नव्या पिढीतील कलावंतांसाठी प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या या यशस्वी वाटचालीचे माणगाव परिसरातून कौतुक होत आहे.





### भाजी विक्रेत्यांचा रस्त्यावरच संसार

**तळा :** तळा बाजारपेठेत भाजी मंडईची सुविधा उपलब्ध नसल्याने तालुक्यातील खेड्यापाड्यातून आलेले भाजी विक्रेते रस्त्यावरच भाजीची विक्री करण्यास भाग पडत आहेत. त्यामुळे बाजारपेठेत वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत असून नागरिकांनाही ये-जा करताना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दररोज सकाळी तालुक्यातील विविध गावांमधून शेतकरी ताजी भाजी घेऊन तळा बाजारपेठेत येतात. मात्र, त्यांच्यासाठी स्वतंत्र भाजी मंडईची व्यवस्था नसल्याने ते रस्त्याच्या कडेला, फुटपाथवर आणि मुख्य रस्त्यावरच भाजी मांडून विक्री करतात. त्यामुळे बाजारपेठेतील मुख्य रस्ता अरुंद होतो, वाहने अडकतात आणि वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. पादचाऱ्यांनाही रस्त्यावरून चालणे अवघड होते. भाजी विक्रेत्यांचीही यामुळे मोठी गैरसोय होते. उन्हात, पावसात रस्त्यावर बसून भाजी विकावी लागते. त्यांना बसण्यासाठी, भाजी ठेवण्यासाठी आणि ग्राहकांना थांबण्यासाठी योग्य जागा मिळत नसल्यामुळे त्यांचा व्यवसायही प्रभावित होतो. त्यामुळे तळा नगरपंचायतीने शहरात भाजी मंडईची व्यवस्था करावी, अशी मागणी भाजी विक्रेते आणि शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली आहे

# जीवनवाहिनीला प्रदूषणाचा विळखा

- पाण्यावर शेवाळ अन् केमिकलचा तवंग
- सुधागडातील नागरिकांसह प्राण्यांचे आरोग्य धोक्यात



**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यासह खालापूर, रोहा व पेण इत्यादी तालुक्यातून वाहणारी व अनेकांची जीवनवाहिनी असलेल्या अंबा नदीतून पाली शहराला पाणी पुरवठा होतो. तसेच, सुधागड तालुक्यातील अंबा नदी शेजारील गावांतील लोक व प्राणी देखील याच पाण्याचा पिण्यासाठी व वापरासाठी वापर करतात. मात्र, सध्या अंबा नदीचे पाणी शेवाळ व केमिकलच्या तवंगामुळे प्रदूषित झाले आहे. पाण्यावर शेवाळ व रसायनामुळे हिरवट, पिवळा व लालसर तवंग आला आहे. त्यामुळे तालुक्यातील नागरिक, भाविक व प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

**शुद्ध पाणी योजनेचा विसर**

पाली शुद्ध पाणी योजना ही १९७४ साली मंजूर झाली आहे. सध्यास्थितीत तिचा एकूण खर्च आता २५ कोटींवर गेला आहे. मात्र, ही २५ कोटिंची शुद्ध पाणी पुरवठा योजना लालफितीत अडकली आहे. राजकीय हेवेदावे आणि प्रशासकीय बाबी यामध्ये ही योजना अडकल्यामुळे पालीकर अजुनही शुद्ध पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत. सर्व निवडणुकीच्या प्रचारात सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी व तत्कालीन मंत्री यांनी शुद्ध पाणी योजना कार्यान्वित करू असे आश्वासन देतात. मात्र अजून काहीच झालेले नाही. प्रशासन व राजकारण्यांना पालीकरांचे हाल दिसत नाहीत. केवळ निवडणुकीपुरते आश्वासन दिले जाते असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

**पालीकरांना दूषित पाणी पुरवठा**

अंबा नदीच्या पाण्यावर कोणतीही शुद्धीकरण व क्लोरीनेशनची प्रक्रिया न करता थेट पालीकरांना पुरविले जाते. अशा प्रकारे कित्येक वर्षे पालिकरांच्या आरोग्याशी खेळले जात आहे. पाली हे अष्टविनायक क्षेत्र आहे. येथे रोज हजारो भाविक येत असतात. पालीची स्थायी लोकसंख्या देखील पंधरा हजारहून अधिक आहे. अशा परिस्थितीत भाविक व नागरिकांना नाईलाजाने हे गढूळ व खराब पाणी प्यावे व वापरावे लागत आहे. आत्तापर्यंत येथील नळांतून चक्क जिवंत साप, खुबे, शिंपले, मासे आणि किडे अनेकवेळा बाहेर आले आहेत. गाळ, चिखल आणि शेवाळ येणे हे तर नेहमीचेच आहे. शिवाय पाणीपुरवठा देखील अनियमित होतो.

पावसाळ्यानंतर अनेक ठिकाणी बंधारे कार्यान्वीत करुन अंबा नदीचे पाणी अडविले जाते. त्यामुळे या साठलेल्या पाण्यात सध्या मोठ्या प्रमाणात हिरवळ तयार झाली आहे. तसेच, नदीतून वाहून आलेले प्रदूषित व सांडपाणी पुढे वाहून न जाता येथेच साठून राहते. रासायनिक कपंनीमधुन टाकऊ रसायन हे थेट आंबा नदीत सोडले जाते. तसेच, रसायन व सांडपाण्याबरोबरच कचरा आणि घाण देखिल साठते. नदीवर महिला कपडे व भांडी धुतात. तसेच, नदीत टाकलेले निर्माल्य कुजल्याने देखिल पाणी खराब होते. परिणामी ते अधिक दुषित झाले आहे. पाण्याला उग्र स्वरूपाची दुर्गंधी येते, चवही खराब लागते. पाणी प्रदुषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. परिणामी बहुसंख्य नागरिक अधिकचे पैसे खर्च करुन पिण्याच्या पाण्यासाठी बाटलीबंद पाण्याचा आधार घेतात.

> "अंबा नदीचे पाणी लॅबला परीक्षणासाठी पाठवले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने याची त्वरित सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी आम्ही करत आहोत. सोमवारी (दि.८) प्रदूषण नियंत्रण मंडळाला यासंबधीचे पत्र दिले जाईल. नागरिकांनी पाणी उकळून व गाळून प्यावे."
> – सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, पाली

# तरूणाला मारहाण करून मोबाईल हिसकावला

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील करंजाडे येथे तरुणाला मारहाण करून त्याचा महागडा मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावून घेत फोन-पेच्या माध्यमातून बँक खात्यातून ५ हजार रुपये काढून घेतल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तीन आरोपींना अटक करून मुद्देमाल जप्त केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अब्बासुद्दीन मोहम्मद अल्लाउद्दीन (३२) हे जेवणासाठी जात असताना पळस्पे ते जेएनपीटी महामार्गालगत करंजाडे परिसरात आरोपींनी त्यांना मारहाण केली. त्यानंतर त्यांच्याकडील मोबाईल फोन हिसकावून घेतला. तसेच, मोबाईलमधील फोन-पे ॲपचा पासवर्ड जबरदस्तीने मिळवून त्यांच्या बँक खात्यातून ५ हजार रुपये काढून घेतले. अशा प्रकारे एकूण ६४ हजार ९९९ रुपयांची लूट करण्यात आली. त्यानंतर पनवेल शहर पोलीस पथकाने औस सलमान मुकादम (२५), हमजा उर्फ गोलू तस्लीम शेख (२३) आणि आवेश जाबीर मालदार (२७) या तिघांना अटक केली. त्यांच्याकडून दुचाकी, मोबाईल, रोख रक्कम, चोरीस गेलेला मोबाईल असा एकूण १ लाख ८४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

# बस स्थानकावर तिसरी नजर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल बस स्थानक परिसरात प्रवाशांचे खिसे कापणे, बॅगा लंपास करणे तसेच हातसफाईच्या माध्यमातून चोरी करण्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी आता तिसऱ्या डोळ्याची नजर राहणार आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पनवेल महानगरपालिकेच्या सहकार्याने बस स्थानकाच्या बाहेरील परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला असून नागरिकांनी पोलीस आणि महापालिका प्रशासनाचे आभार मानले आहेत. पनवेल बस स्थानकात एसटी महामंडळाच्या माध्यमातून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत आहे. मात्र, बस स्थानकाच्या बाहेरील परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने प्रवाशांचे खिसे कापणे, बॅगा पळविणे आणि अन्य चोरीच्या घटनांवर लक्ष ठेवणे पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरत होते. बस स्थानकाबाहेर घडणाऱ्या गुन्ह्यांचा तपास करताना सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसल्यामुळे अडचणी निर्माण होत होत्या. ही बाब लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी पनवेल महानगरपालिका प्रशासन तसेच एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यासाठी पाठपुरावा सुरू केला. एसटी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी अभिजीत पाटील यांच्याकडेही यासंदर्भात पत्रव्यवहार करण्यात आला. त्यांनी या महत्त्वाच्या कामासाठी तातडीने लेखी परवानगी दिल्यानंतर सीसीटीव्ही बसविण्याचा मार्ग मोकळा झाला.

### प्रवाशांच्या सुरक्षेसाठी खाकीतील सखी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाच्यावतीने विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत पनवेल रेल्वे स्थानकात महिला प्रवाशांसह नागरिकांना सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. 'खाकीतील सखी', 'भरोसा कर', 'या घोषवाक्याच्या माध्यमातून महिलांमध्ये पोलिसांविषयी विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# ऑक्टोबर संपताच थंडीची चाहूल



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

ऑक्टोबर हिटचा उकाडा संपला आहे. सध्या वातावरणात बदल होते असून, जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून सकाळी व रात्री गारवा पडत आहे. त्यामुळे थंडीची चाहूल लागली आहे. सकाळी व रात्री तापमान २२ ते २५ अंश सेल्सिअस पर्यंत उतरते.

रायगड जिल्ह्यात पहाटे सर्वत्र धुक्याची दुलई पसरत आहे. अल्हाददायक वातावरणाचा पर्यटक व प्रवाशी मनसोक्त आनंद लुटत आहेत. दुपारी सुद्धा वातावरणात गारवा जाणवत आहे. याशिवाय डोंगरावर विशेषतः पांढऱ्या शुभ्र व करड्या रंगांचे ढग दाटून येत आहेत. जणूकाही येथे स्वर्गच असल्याचा भास होतो. यातच आजूबाजूला पसरलेल्या गर्द हिरवाईने हा अद्भुत नजारा आणखीच बहारदार होतो. त्यामुळे येथून प्रवासी व पर्यटक सुद्धा ढग, हिरवाई, व धुक्याचा आनंद घेत आहेत. ट्रॅकिंग व पर्यटनासाठी हे वातावरण उत्तम आहे. त्यामुळे बरेचसे ट्रेकर व पर्यटक किल्ले, डोंगर, समुद्रकिनारा आदी ठिकाणी भटकंती करत आहेत. आणि या अद्भुत निसर्गाची मज्जा लुटतात. ताम्हाणी घाट, वरंध घाट व मोर्बे घाट येथून प्रवास करतांना ढगांची अनुभूती मिळत आहे. असंख्य पर्यटक येथे आवर्जून थांबून मज्जा लुटत आहेत. शिवाय रायगड, सुधागड, सरसगड, मानगड, सुरगड, मृगगड, विश्रामगड, कर्नाळा इत्यादींसह जिल्ह्यातील इतरही उंचावरील किल्ल्यांवर ढग व धुके पसरलेले असते. त्यामुळे येथे येणारे दुर्गप्रेमी व ट्रेकर्स दुर्गभ्रमंती बरोबरच ढगांची व धुक्याची अनुभूती घेतात. ताजे व प्रफुल्लीत करणारे हे वातावरण सर्वांनाच आकृष्ट करत आहे. प्रफुलित करणारे वातावरण आणि दिवाळीच्या सुट्ट्या यामुळे जिल्ह्यात पर्यटन वृद्धि सुद्धा होताना दिसत आहे.

# बेशिस्त पार्किंगचा अग्निशमनला अडथळा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे परिसरातील टर्निंग पॉइंटवरील बेशिस्त पार्किंगचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. रस्त्याच्या वळणांवर दुतर्फा उभी केली जाणारी वाहने नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असून, आता आपत्कालीन सेवांनाही त्याचा फटका बसत असल्याचे समोर आले आहे. कामोठे सेक्टर १२ येथे लागलेल्या आगीच्या घटनेदरम्यान टर्निंग पॉइंटवरील वाहनांमुळे अग्निशमन दलाच्या गाड्यांना घटनास्थळी पोहोचताना अडथळे आणि विलंबाचा सामना करावा लागल्याची परिस्थिती निर्माण झाली. कामोठ्यातील टर्निंग पॉइंटवर बेशिस्त पार्किंग ही रोजची समस्या बनली आहे. या वाहनांमुळे सामान्य नागरिकांना ये-जा करताना अडचणी येतातच; शिवाय महापालिकेच्या कचरा वाहून नेणाऱ्या गाड्यांनाही मार्ग काढणे कठीण होते. अनेकदा रुग्णवाहिकांनाही वळण घेण्यासाठी कसरत करावी लागते. मात्र, आगीच्या घटनेत अग्निशमन दलाच्या वाहनांना अडथळे निर्माण होण्याची वेळ आल्याने या समस्येचे गांभीर्य पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अग्निशमन दलाच्या वाहनांना घटनास्थळी पोहोचण्यास होणारा विलंब मोठ्या दुर्घटनेला कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे रस्त्यावरील बेशिस्त पार्किंग हा केवळ वाहतुकीचा प्रश्न नसून नागरिकांच्या जीविताशी संबंधित सुरक्षेचा विषय बनला आहे.












## मोदी माफी मागतील?

बरोबर दहा वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी नावाच्या एका राजाच्या मनात असे आले की भारतात नोटबंदी करण्याची गरज आहे. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री आठ वाजता त्यांनी देशाला उद्देशून भाषण केले आणि नोटबंदीची घोषणा केली. पाचशे आणि एक हजार रुपयांच्या नोटा चलनातून तात्काळ बाद झाल्या. ज्यांच्याकडे त्या नोटा होत्या त्या त्यांनी बँकांमध्ये जाऊन बदलून घ्याव्यात असा फतवा निघाला. मोदी अशी घोषणा करणार आहेत याची त्यांचेच अर्थमंत्री असलेले अरुण जेटली यांनाही बहुदा कल्पना नव्हती. कारण त्या संध्याकाळी ते एका कौटुंबिक लग्नाच्या कार्यक्रमाला गेले होते. इतर मंत्र्यांचा तर प्रश्नच नव्हता. त्यांच्यापैकी अनेकांनी आपल्याला जनतेप्रमाणेच टीव्हीवरून ही बातमी कळली असे नंतर खासगीत सांगितले. याचाच अर्थ मोदींनी निर्णय घेताना मंत्रिमंडळाला विचारात घेतले नव्हते. त्याची संमती घेणे तर अजून दूरची गोष्ट. देशातील काळा पैसा नष्ट करण्यासाठी हे पाऊल उचलत असल्याचे मोदींनी आपल्या भाषणात सांगितले होते. शिवाय काश्मीर व इतर ठिकाणचे दहशतवादी बनावट नोटा वापरत असून त्यांच्या वर्मावर घाव घालण्यासाठी ही बंदी आवश्यक असल्याचेही ते म्हणाले होते. प्रत्यक्षात नोटबंदीमुळे ना काळा पैसा संपला ना दहशतवादी कृत्ये थांबली. काळा पैसावाले लोक पाचशे व हजारांच्या नोटांच्या रुपात आपले पैसे साठवून ठेवत असतात असा समज होता. नोटबंदीनंतर बँकेत नोटा बदलून घेताना ते कुठून मिळाले हे सांगावे लागत होते. म्हणजेच ते काळे नाहीत हे सिध्द करावे लागणार होते. त्यामुळे बुहतांश काळ पैसा बँकेत परत येणारच नाही असे मानले जात होते. प्रत्यक्षात रिझर्व्ह बँकेने २०१८मध्ये जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार रद्द केलेल्या नोटांपैकी ९९.३ टक्के नोटा बँकेत परत आल्या. उरलेले ०.७ टक्के पैसे हे काळेच असतील असे नव्हे. पण समजा ते तसे मानले तरीही देशात काळा पैसा एक टक्काही नाही असा अजब निष्कर्ष निघाला.

### रांगांमधले मरण

एका अर्थाने हा निष्कर्ष खरा होता. कारण, काळा पैसा हा कधीच नोटांच्या स्वरुपात साठवून ठेवला जात नाही. तो जमीन, सोने किंवा अन्य ठिकाणी गुंतवला जातो. शिवाय काळ्याचे पांढरे करण्याचे शेकडो मार्ग आपल्याकडे उपलब्ध आहेत. गुजरातेतील सहकारी बँकांकडे अनेकांनी हा काळा पैसा जमा केला व त्यांच्यामार्फत काळ्याचा पांढरा करण्यात आला असा आरोप तेव्हा झाला व आजही केला जातो. यात भाजपच्या वरिष्ठ अशा काही नेत्यांचे नाव घेतले जाते. पण ज्यांच्या हातात बँक, त्यांचेच सरकार असल्याने बहुदा त्याची चौकशी झाली नाही. या काळात काळा पैसा बाहेर आल्याचे एकही मोठे प्रकरण घडले नाही. एकाही माणसाला यातून शिक्षा झाली नाही. दुसरीकडे देशातील दहशती हल्लेही थांबले नाहीत. काश्मीरमध्ये पुलवामा तसेच पहलगाम इथे दोन भीषण हल्ले झाले. मध्यंतरी दिल्लीमध्येही बाँबस्फोट झाले. पहलगाममधील दहशतवादी कित्येक महिने सरकारला सापडत नव्हते. थोडक्यात मोदींनी ज्याच्यासाठी नोटबंदी केली ते दोन्ही उद्देश साफ असफल झाले. याचा अर्थ मोदींनी सर्व बाजूंचा विचार करून हा निर्णय घेतला नव्हता किंवा त्यांना खरी परिस्थिती ठाऊक असूनही आपण काळ्या पैशांविरुध्द कसे लढत आहोत हे दाखवण्यासाठी हे सर्व नाटक रचले होते. २०१४ च्या निवडणुकीत स्विस बँकांमध्ये ठेवलेला काळा पैसा देशात परत आणल्यास देशातील प्रत्येक बँक खात्यात १५ लाख रुपये जमा करता येतील असे मोदी प्रचारसभेत सांगत असत. सत्तेवर येऊन दोन वर्षे होऊनही त्यांनी त्याबाबत काहीही हालचाल केली नव्हती. त्यावर उतारा म्हणूनही कदाचित त्यांनी हा सगळा खेळ मांडला असावा. वाईट बाब अशी की एका पंतप्रधानाचे हे नाटक किंवा खेळ जनतेच्या जिवावर उठणारा ठरला. जनतेला कोणतीही पूर्वसूचना न मिळता नोटबंदी झाल्याने हातावर पोट असलेल्यांचे अक्षरशः मरण ओढवले. त्यांच्या घरातल्या घरात पाचशे आणि हजारांच्या नोटा एका रात्रीत बेकायदा ठरल्या. त्या बदलून घेण्यासाठी बँकांकडे रांगा लावाव्या लागल्या. त्या रांगांमध्ये खास भारतीय पध्दतीची अनागोंदी, बेबंदशाही व भ्रष्टाचार होता. बँकांमध्ये ओळख असलेल्यांना आतून पैसे बदलून मिळाले. बाकी गरीब जनता मात्र रांगांमध्ये उभे राहून मेली.

### जनता जाब विचारील

बांधकाम किंवा हॉटेलच्या व्यवसायात कामगारांचे पगार दर आठ दिवसांनी आणि रोख स्वरुपात करण्याची पध्दत आहे. पण तेथील मालकांकडच्या नोटा रद्दी ठरल्याने त्यांची पंचाईत झाली. अनेक धंद्यांमध्ये रोखीचे व्यवहार केले जातात ते ठप्प झाले. त्यामुळे त्या धंद्यातील कामगारांचे पगार होईनासे झाले. शिवाय, अनेक छोट्या धंदेवाल्यांच्या पैशांचे सायकल बिघडल्याने धंदा गुंडाळावा लागला. हे सगळे एका नेत्याच्या मनमानीमुळे झाले. भारताच्या लोकशाहीची देखील पाचशे व हजार रुपयांच्या नोटांप्रमाणे रद्दी झाली. या निर्णयाविरुध्द बोलणारांना देशद्रोही ठरवण्यात आले. आता दहा वर्षानंतर मोदी नोटबंदीबाबत चकार शब्दही काढत नाहीत. इंदिरा गांधी यांच्या आणीबाणीबद्दल खुद्द बाईंपासून ते मनमोहनसिंगांपर्यंत अनेकांनी खेद व्यक्त करून झाला. आता त्यांच्या सूनबाई सोनिया गांधी यांनी आपल्या नव्या पुस्तकात याबाबत लेखी रीत्या आणीबाणी ही चूक होते असे म्हटले आहे. पण नोटबंदीबद्दल मोदी आणि त्यांचा पक्ष कधीतरी माफी मागेल काय असा सवाल आहे. कारण, मोदींनी एखाद्या हुकुमशहाप्रमाणे नोटबंदीचा तो निर्णय घेतला होता. शिवाय त्याने देशात आर्थिक आणीबाणीची स्थिती असल्यासारखी स्थिती निर्माण झाली. मोदींनी नोटबंदीसाठी सांगितलेला एकही उद्देश साध्य झाला नाही. याची जबाबदारी त्यांनी मान्य करायला हवी. नोटबंदीचा ताप वाढला तशी मोदींनी आणखी बरीच भाषणे तेव्हा केली. देशातील डिजिटल व्यवहार वाढवण्यासाठी नोटबंदीचा उपयोग होईल असे एक नवीन कारण त्यांनी नंतर दिले. यूपीआय किंवा गुगलपे, फोनपेचे व्यवहार वाढवण्यासाठी देशातील अब्जावधी लोकांना त्रास देण्याचा हा प्रकार अद्भुत होता. पण तेही कारण खोटे होते. कारण देशातील डिजिटल व्यवहार वाढले तरी लोकांकडच्या रोख रकमेचे प्रमाणही तितकेच आहे. किंबहुना तेव्हा ते एकूण जीडीपीच्या अकरा टक्के होते ते आता बारा टक्क्यांवर गेल् आहे. म्हणजे हे कारण हादेखील जनतेला गंडवण्याचा प्रकार होता हे सिध्द झाले. आज मोदी त्या नोटबंदीबाबत किंवा काळ्या पैशांबाबत किंवा परदेशातून काळा पैसा आणण्याबाबत चुकूनही वार्ता करत नाहीत. या देशातील भ्रष्टाचार, नोकरशाहीची खाबूगिरी, बिल्डर मंडळींचे काळे धंदे थांबलेले नाहीत. उलट बहुदा वाढलेच आहेत. मधल्या काळात खुद्द मोदींच्या पक्षाने निवडणूक रोख्यांची मोहीम राबवून भाजपसाठी हजारो कोटी रुपयांच्या देणग्या मिळवल्या. सर्वोच्च न्यायालयाने नंतर ही योजना बेकायदा ठरवली. एका अर्थाने जमा केलेला हा निधी काळा पैसाच आहे. सुदैवाने आता जनतेच्या मनाची गुंगी आणि हिंदू विरुध्द मुस्लिम विद्वेषाचा अंमल आता हळूहळू उतरत आहे. तीच एक ना एक दिवस या सर्व पापांचा हिशेब मागेल.

विचार

# संकट समुद्रात, परीक्षा जमिनीवर

***जगाच्या हवामान व्यवस्थेवर मोठे संकट येण्याची चाहूल लागली आहे. प्रशांत महासागराच्या पाण्याचे असामान्य तापमान, सक्रिय 'अल-निनो'च्या तीव्रतेबाबतचा इशारा हा शेती, पाणी, आरोग्य, ऊर्जा, अन्नसुरक्षा आणि एकूणच अर्थव्यवस्थेसाठी गंभीर इशारा आहे. हवामानबदलाच्या पार्श्वभूमीवर अल-निनो'च्या परिणामांची तीव्रता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संकटाची पूर्वतयारी करणेच शहाणपणाचा मार्ग आहे.***



मिलिंद बेंडाळे

जागतिक हवामान संघटनेच्या आकलनानुसार 'अल-निनो' फेब्रुवारी २०२७ पर्यंत टिकून राहण्याची शक्यता जवळपास शंभर टक्के आह प्रशांत महासागराच्या काही भागातील तापमान सामान्यापेक्षा २.६ अंश सेल्सिअसपर्यंत वाढले आहे. 'निनो' ३.४ निर्देशांकानुसार मे ते जुलै २०२६ या काळात समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यापेक्षा सरासरी १.५ अंशांनी अधिक होते. जुलैअखेर ते ऑगस्टच्या मध्यापर्यंत हे तापमान सामान्यापेक्षा २.२ ते २.६ अंशांनी अधिक राहिले. समुद्राच्या काही अंतर्गत भागांमध्ये तापमान सामान्यापेक्षा आठ अंशांहून अधिक वाढल्याचेही निरीक्षण नोंदवले गेले आहे. ही आकडेवारी केवळ हवामानशास्त्रीय नोंद नाही. तिच्यामागे भविष्यातील अनिश्चिततेची मोठी सावली आहे. समुद्र तापतो तेव्हा संकट किनाऱ्यावरच थांबत नाही. समुद्र आणि वातावरण यांचे नाते अत्यंत गुंतागुंतीचे आहे. समुद्राच्या तापमानातील मोठे बदल जगभरातील वाऱ्यांची दिशा, पर्जन्यमान आणि तापमानाचे स्वरूप प्रभावित करू शकतात. त्यामुळे प्रशांत महासागरातील असामान्य उष्णता भारतातील शेतकऱ्याच्या शेतापर्यंत आणि शहरातील नागरिकाच्या घरापर्यंत पोहोचू शकते. याच कारणामुळे 'अल-निनो'च्या शक्य परिणामांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. कुठे अतिवृष्टी आणि पूर, तर कुठे पावसाची कमतरता आणि दुष्काळ; काही भागांमध्ये विक्रमी उष्णता, तर काही ठिकाणी पावसाच्या पद्धतीत मोठे बदल अशी परस्परविरोधी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जगातील जवळपास सर्व भूभागांवर सामान्यापेक्षा अधिक तापमान राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. म्हणजेच 'अल-निनो' आला की पाऊस कमी एवढे साधे समीकरण आता पुरेसे नाही. हवामान व्यवस्था अधिक गुंतागुंतीची होत चालली आहे. एका प्रदेशात दुष्काळ असताना दुसऱ्या प्रदेशात अतिवृष्टी होऊ शकते. त्यामुळे राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील नियोजनही या बदलत्या वास्तवाशी सुसंगत असले पाहिजे. भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी मॉन्सूनचे महत्त्व आजही प्रचंड आहे. सिंचनाची साधने वाढली असली, तरी शेती अजूनही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे मॉन्सूनच्या स्वरूपातील कोणताही मोठा बदल थेट शेतकऱ्याच्या उत्पन्नावर परिणाम करू शकतो. भारतातील मॉन्सूनवर 'अल-निनो'चा परिणाम होतो, हे दीर्घकाळच्या हवामान नोंदी आणि अभ्यासांमधून दिसून आले आहे; मात्र हा परिणाम देशभर एकसारखा होत नाही. उत्तर भारतात परिणाम तुलनेने अधिक दिसून येऊ शकतो, तर मध्य भारतात त्याचे स्वरूप वेगळे असू शकते. दक्षिण भारतातही परिणामाचे प्रमाण आणि स्वरूप वेगळे राहू शकते. त्यामुळे संपूर्ण भारतासाठी एकच हवामान अंदाज किंवा एकच धोरण आखणे पुरेसे ठरणार नाही. विशेषतः महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान आणि भौगोलिकदृष्ट्या विविध राज्यासाठी जिल्हानिहाय हवामान नियोजनाची गरज अधिक आहे. एखाद्या जिल्ह्यात पावसाचे दिवस कमी होऊन अल्पावधीत मुसळधार पाऊस पडत असेल, तर पारंपरिक पेरणी, पीकनियोजन आणि जलव्यवस्थापनाच्या पद्धती बदलाव्या लागतील.

यापुढील शेती ही केवळ 'किती पाऊस पडेल' या प्रश्नावर चालणार नाही; तर 'पाऊस केव्हा, किती वेळ आणि किती तीव्रतेने पडेल' या प्रश्नावर आधारित असावी लागेल. हवामानबदलाच्या युगातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे विरोधाभासी हवामान घटना. आता पाऊस कमी पडणे हीच समस्या राहिलेली नाही. कमी दिवसांमध्ये प्रचंड पाऊस पडणे हीदेखील तितकीच गंभीर समस्या आहे. उपलब्ध अभ्यासानुसार 'अल-निनो'च्या काळात काही दमट भागात अतिवृष्टीची शक्यता वाढू शकते, तर आधीच कोरड्या असलेल्या प्रदेशांमध्ये पावसाचे प्रमाण किंवा मुसळधार पावसाच्या घटनांमध्ये घट होऊ शकते. मध्य आणि दक्षिण-पश्चिम भारतासारख्या भागांमध्ये पाऊस कमी दिवसांमध्ये; पण अधिक तीव्रतेने पडण्याची शक्यता वेगळीच चिंता निर्माण करते. याचा अर्थ धरणे, जलाशय आणि नदी व्यवस्थापनाचे धोरणही बदलावे लागेल. अतिवृष्टीच्या वेळी पाणी साठवण्याची क्षमता आणि दुष्काळाच्या काळात ते उपलब्ध करून देण्याची व्यवस्था यात संतुलन साधावे लागेल. शहरांमध्ये पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी असलेली यंत्रणा सक्षम करावी लागेल. अन्यथा, एकाच वर्षी एका भागात पाणीटंचाई आणि दुसऱ्या भागात पूर अशी विचित्र परिस्थिती दिसू शकते. हवामानसंकटाच्या काळात शेतकऱ्याला नुकसानभरपाई देणे ही सरकारची जबाबदारी आहे; परंतु त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे नुकसान होऊ नये यासाठी आधीच माहिती उपलब्ध करून देणे.

पेरणी कधी करावी, कोणते पीक निवडावे, किती क्षेत्रावर पेरणी करावी, खतांचा वापर कसा करावा, पावसाच्या खंडात कोणती उपाययोजना करावी, अतिवृष्टीपूर्वी कोणती तयारी करावी या सर्व प्रश्नांची स्थानिक पातळीवरील हवामान माहिती शेतकऱ्याला वेळेवर मिळणे आवश्यक आहे. हवामान अंदाज हा केवळ मोबाईलवरील सूचना किंवा वृत्तवाहिनीवरील बातमी राहता कामा नये. तो शेतकऱ्याच्या निर्णयप्रक्रियेचा भाग झाला पाहिजे. 'अल-निनो'मुळे पावसाच्या स्वरूपात बदल झाल्याचा परिणाम शेतीपुरता मर्यादित राहणार नाही. धान्य, डाळी, भाजीपाला, फळे यांचे उत्पादन घटले किंवा अस्थिर झाले, तर अन्नधान्याच्या किमती वाढू शकतात. आधीच महागाईचा सामना करणाऱ्या सामान्य नागरिकावर त्याचा अतिरिक्त भार पडू शकतो. पाणीटंचाई वाढल्यास ग्रामीण भागातील संघर्ष, शहरांकडे होणारे स्थलांतर आणि औद्योगिक क्षेत्राच्या पाणीवापराबाबतचे प्रश्नही तीव्र होऊ शकतात. त्यामुळे जलसंधारण, पाण्याचा पुनर्वापर, भूजल पुनर्भरण आणि पीकपद्धतीत बदल यांना आता पर्याय उरलेला नाही. असामान्य उष्णता ही आरोग्यासाठीही मोठी जोखीम आहे. त्यातून उष्माघात, निर्जलीकरण, हृदयविकार आणि उष्णतेशी संबंधित इतर समस्या वाढू शकतात. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, बाहेर काम करणारे कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग अधिक असुरक्षित ठरतो. त्यामुळे हवामान अंदाजासोबत आरोग्य विभागाची कृती योजना तयार असणे आवश्यक आहे. शहरांमध्ये उष्णता कृती आराखडे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, कामाच्या वेळांमध्ये बदल आणि संवेदनशील नागरिकांसाठी स्थानिक पातळीवरील सूचना यांना महत्त्व द्यावे लागेल.

'अल-निनो' ही नैसर्गिक घटना आहे. त्यामुळे प्रत्येक पूर, दुष्काळ किंवा उष्णतेच्या लाटेचे खापर त्यावर फोडणे योग्य ठरणार नाही. स्थानिक नियोजनातील त्रुटी, नद्यांवरील अतिक्रमणे, जलनिचरा यंत्रणेची कमतरता, अव्यवस्थित शहरीकरण, जंगलतोड आणि पाण्याचा अतिरेकी वापर हे घटक संकटाची तीव्रता वाढवतात. हवामानातील बदलता धोका हा प्रशासनाच्या कमतरतेसाठी निमित्त ठरू नये. उलट, हवामानातील अनिश्चितता वाढत असताना नियोजनाची गुणवत्ता अधिक उंचावली पाहिजे. पूर्वसूचना मिळूनही पूर आला आणि जीवितहानी झाली, तर प्रश्न केवळ हवामानाचा राहत नाही, तर आपत्ती व्यवस्थापनाचा बनतो. दुष्काळाचा अंदाज असूनही पाणी नियोजन झाले नाही, तर ती केवळ निसर्गाची चूक राहत नाही; ती प्रशासनाचीही जबाबदारी ठरते. या पार्श्वभूमीवर सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'अर्ली वॉर्निंग'ला 'अर्ली ॲक्शन'मध्ये रूपांतरित करणे. हवामान खात्याने इशारा दिला, सरकारने प्रसिद्धीपत्रक काढले आणि नागरिकांनी बातमी पाहिली इतके पुरेसे नाही. हवामान अंदाज जिल्हा प्रशासनापर्यंत, तेथून ग्रामपंचायतीपर्यंत आणि ग्रामपंचायतीतून शेतकरी व नागरिकांपर्यंत पोहोचला पाहिजे. पूरप्रवण भागात स्थलांतराची यंत्रणा, दुष्काळग्रस्त भागात पाण्याचे नियोजन, शेतकऱ्यांसाठी पीक सल्ला आणि आरोग्य विभागाची तयारी आधीच सुरू झाली पाहिजे. जागतिक हवामान संघटनेनेही राष्ट्रीय हवामान व जलविज्ञान संस्थांसोबत पूर्वसूचना आणि आपत्तीपूर्व तयारी मजबूत करण्यावर भर दिला आहे. असामान्य 'अल-निनो'साठी असामान्य पातळीची तयारी आवश्यक असल्याचा संदेश यातून स्पष्ट होतो.

चर्चा आजची

# वन क्षेत्र धोक्यात



प्रमोद जाधव

भूमी माफियांच्या मक्तेदारीमुळे जंगलातील झाडांची तोड होऊन माती, दगड उत्खननाचा सुळसुळाट वाढला आहे. वन विभागाकडून कारवाई केली जाते. मात्र अपुऱ्या मनुष्यबळामुळे ही कारवाई ठोस होत नसल्याचे चित्र आजही जिल्ह्यात आहे. जंगल तोडीमुळे जंगलांमधील वनसंपदा नष्ट होण्याची भिती निर्माण झाली आहे. वनांचे क्षेत्रही कमी होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. अलिबागच्या वन विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये पुर्वी एक हजार ७९ हेक्टर इतके वन क्षेत्र होते. आता मात्र या वन क्षेत्रात घट झाली आहे. सध्या एक हजार ४५.६३ इतके वन क्षेत्र आहे. या वन क्षेत्रामध्ये वेगवेगळे वन्य जीव राहत आहेत. त्यामुळे वन क्षेत्र धोक्यात असल्याची भिती व्यक्त केली जात आहे.

वन जमीन संरक्षणासाठी विभागाकडून वेगवेगळ्या पध्दतीने उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जात आहे.वनाचे क्षेत्र वाढविण्याबरोबरच त्याचे संवर्धन करण्यासाठी वन विभाग प्रयत्न करत आहे. बांबू लागवडीपासून वेगवेगळ्या रोपांची लागवड करून वनांचे संरक्षण करण्यासाठी वन विभाग धडपडत असते. मात्र हा प्रयत्न जास्त काळ टीकत नसल्याचा प्रकार समोर आला आहे. एक हजार ४५ हेक्टर पैकी १५४ हेक्टर जमीनीवर काही मंडळींनी अवैधरित्या कब्जा केला आहे. काही घटकांकडून वन जमीनीवर हात भट्टी तयार करणे. अनधिकृत शेड बांधणे, अनधिकृत बांधकाम करणे, बेकायदेशीर कुंपण घालणे, माती, दगड उत्खननासाठी भूमाफियांकडून जमीन बळकावणे हे प्रकार वारंवार घडत आहेत. अतिक्रमण करणाऱ्याविरोधात वन विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. याची नोंदही वन विभागाच्या कार्यालयात आहे.आतापर्यंत तीन हजार ३४ जणांनी अतिक्रमण केले आहे.यामध्ये दोन हजार ३०१ जणांनी इतर कामांसाठी या जमीनीवर अतिक्रमण केल्याची माहिती समोर आली आहे. गुन्हे दाखल होऊन, कारवाईच्या नोटीसा देऊनही प्रत्यक्षात हे अतिक्रमण हटविण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणा कमालीची उदासीन असल्याचे चित्र आहे.अतिक्रमणामुळे स्थानिक वनसंपदेचे नुकसान होत असून वन्य प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाला मोठा धोका निर्माण झाला आहे.

रायगडच्या अलिबाग उपवन संरक्षक विभागाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, सुधागड, कर्जत, खालापूर, पनवेल, उरण या तालुक्यांचा समावेश येतो. त्यामध्ये पनवेल उप विभागात कर्जत पुर्व, कर्जत पश्चिम, खालापूर, पनवेल, उरण व माथेरान तसेच अलिबाग उपविभागाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, वडखळ, नागोठणे, सुधागड या अकरा वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालये आहेत. या वन विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये पुर्वी एक हजार ७९ हेक्टर इतके वन क्षेत्र होते. आता मात्र या वन क्षेत्रात घट झाली आहे. सध्या एक हजार ४५.६३ इतके वन क्षेत्र आहे. या वन क्षेत्रामध्ये वेगवेगळे वन्य जीव राहत आहेत. या आकडेवारीनुसार वन क्षेत्र कमी होण्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे वन क्षेत्र धोक्यात असल्याची भिती व्यक्त केली जात आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग व पनवे विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या १५० हेक्टर पेक्षा जास्त वन जमीनीवर अवैध कब्जा झाल्याची माहिती आकडेवारीनुसार समोर आली आहे. त्यामध्ये पनवेल व अलिबागमध्ये जास्त अतिक्रमण असून जिल्ह्यातील तीन हजार ३४ जणांनी वन जमीनीवर कब्जा केल्याची माहिती स्पष्ट करण्यात आली आहे. त्यात काहींनी घरे, तर काहींनी शेती, बाग बगीचा करण्यासाठी तर काहींनी फार्म हाऊस उभारण्यासाठी तर काही भुमाफियांनी अतिक्रमण केल्याची बाब स्पष्ट झाली आहे. त्यात बारा जणांनी जूलै ते सप्टेंबर या कालावधीत नव्याने अतिक्रमण केल्याची माहिती देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग उपवन विभागाच्या अखत्यारित असलेल्या वन क्षेत्रापैकी दीडशेहून अधिक क्षेत्रावर अतिक्रमण झाले आहे. अतिक्रमण रोखण्यासाठी वन विभागामार्फत कारवाईदेखील करण्यात आली. मात्र अपुऱ्या मनुष्यबळामुळे ठोस कारवाईचा अभाव असल्याचे वन विभागाच्या काही अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. पुरेसे मनुष्यबळ नसल्याचा फटका कारवाईवर बसतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

वनांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या जीवांचे अधिवास असतो. वेगवेगळी औषधी वनस्पती वनामध्ये आहेत. पर्यावरणाचा समतोल वनांमधील झाडांमुळे कायच राखण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र ही झाडे तोडून काही भूमाफिया वने नष्ट करण्याचे धाडस करीत आहेत. काहीजण विकासाच्या नावाखाली वनांची तोड करतात. परंतु हा विकास सर्वसामान्यांसह वन विभागासाठी देखील आगामी काळात डोकेदुखी बनण्याची भिती अनेकांनी व्यक्त केली आहे. वन जमीनीमध्ये ठिकठिकाणी सिमेंटची जंगले बांधली जात आहेत. या सिमेंटच्या जंगलामुळे वन्य प्राण्यांचा वावर लोकवस्तीमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण होईल त्यामुळे मानवी जीवीतालाही मोठा धोका निर्माण होण्याची चिंता अनेकजण व्यक्त करीत आहेत.

लोकसंसद

## हिंदू धर्माची सहिष्णुता : कमजोरी नव्हे, सामर्थ्य!

हिंदूंचा एखादा सण आला की समाजमाध्यमांवर काही स्वतःला प्रगत आणि आधुनिक समजणारे हिंदू, 'आम्ही सण वगैरे साजरे करत नाही', 'असे सण साजरे करून काय मिळते?' किंवा '२१व्या शतकात असे सण का साजरे करायचे?' असे प्रश्न उपस्थित करून आपली वैचारिक प्रगल्भता दाखवण्याचा प्रयत्न करतात. सण साजरे करणे किंवा न करणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न आहे. हिंदू धर्माच्या सर्वसमावेशक आणि उदारमतवादी परंपरेमुळे अशा मतांनाही येथे सहज स्थान मिळते. हिंदू धर्मात मात्र स्वतःच्याच धर्मातील परंपरांवर टीका करण्याचेही स्वातंत्र्य आहे. या उदारमतवादी परंपरेला धर्माची कमजोरी समजण्याची चूक कोणी करू नये. प्रश्न विचारणे, मतभेद व्यक्त करणे, विविध विचारधारांचा स्वीकार करणे आणि स्वतंत्रपणे विचार करण्याची मुभा ही हिंदू धर्माची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत. सहिष्णुता आणि संवादाच्या समृद्ध परंपरेमुळे स्वतःच्याच धर्मातील रूढी-परंपरांवर प्रश्न उपस्थित करण्याची मोकळीक मिळते. याच व्यापक वैचारिक दृष्टिकोनामुळे हिंदू धर्माने अनादि काळापासून आपले अस्तित्व आणि वैशिष्ट्यपूर्ण ओळख टिकवून ठेवली आहे. ज्या धर्माच्या सहिष्णुतेमुळे आणि विचारस्वातंत्र्यामुळे आपली मते मांडण्याची मुभा मिळते, त्याच धर्माचा कोणताही सखोल अभ्यास न करता केवळ टीका करण्यासाठी टीका करणे ही वैचारिक प्रगल्भता नव्हे, तर कृतघ्नताच म्हणावी लागेल! त्यामुळे टीका करण्यापूर्वी आपल्या धर्मातील परंपरा, तत्त्वज्ञान आणि त्यामागील विचार समजून घेण्याचा प्रयत्न करावा, एवढीच अपेक्षा!

**– अनिकेत शेटे, पुणे**

दिनविशेष

# दिवाळीचा सण मोठा नाही आनंदा तोटा !

दिवाळी म्हणजे दीपोत्सव तमा कडून तेजाकडे, अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी स्फूर्ती देणारा, स्फूर्ती देणारा हा सणआहे. भारतीय संस्कृतीत सणांना वेगळे महत्त्व आहे केवळ मौजमजा करणे हा त्यांचा उद्देश असून जीवन समृद्ध व्हावे मनुष्याची भौतिक आणि आध्यात्मिक प्रगती व्हावी उन्नती व्हावी त्यामागचा उद्देश आहे

हिंदु संस्कृती आणि परंपरा मनुष्य जीवनाचे सार्थक करण्यासाठी अत्यंत उपयोगी आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ साध्य करण्यासाठी मनुष्याने प्रयास करायला हवे असे हिंदु संस्कृती सांगते. नरक चतुर्दशी या दिवशी भगवान श्रीकृष्णाने नरकासुराचा वध करून त्याने बंदिवान केलेल्या १६ सहस्त्र स्त्रियांना मुक्त केले. त्यांना समाजात मान आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांचे पालकत्व घेतले त्यांना सनाथ केले. हिंदू संस्कृतीत स्त्रीला देवतेचा दर्जा दिलेला आहे.

**यत्र नार्यस्तु पूजन्ते**
**रमन्ते तत्र देवता।**

परंतु सध्या स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन कलुषित झालेला आहे स्त्री सुरक्षित नाही, 'लव जिहाद' मुळे युवती एका दुष्ट चक्रात सापडल्या जात आहे. 'मेरा अब्दुल ऐसा नही' असा अत्यंत विपर्यस्त आणि चुकीचा दृष्टिकोन बाळगून आपले जीवन धोकादायक करत आहेत त्यांचे प्रबोधन करणे, भीषण वास्तवाच्या परिणामांची जाणीव त्यांना करून देणे ही एक सामाजिक मोठी जबाबदारी आहे. अश्विन अमावस्या म्हणजे लक्ष्मीपूजनाचा दिवस. स्वकष्टाने आणि सन्मार्गाने मिळवलेल्या धनसंपत्तीला लक्ष्मी असे म्हणतात. या दिवशी लक्ष्मी आणि कुबेर यांची पूजा केली जाते संपत्तीच्या रक्षणाचे काम कुबेर करतो. भ्रष्टाचाराने आणि अवैध उद्योगाने मिळवलेला पैसा संपत्ती म्हणजे लक्ष्मी नव्हे. आपल्या घरात असा पैसा संपत्ती येणार नाही याची घरातील गृहलक्ष्मीने घ्यायला हवी. पैसे आहेत म्हणून त्याची उधळपट्टी न करता त्याची योग्य सुरक्षितता आणि साठवणूक आणि गुंतवणे आवश्यक आहे.

**बलिप्रतिपदा!**

बळीराजा अत्यंत दानशूर होता. दान देणे हा गुण असला तरीही गुणाचा अतिरेक दोषात परिवर्तित होतो. दान नेहमी सत्पात्री असायला हवे. अपात्र व्यक्तीला मागेल ते दान दिल्यामुळे समाज असुरक्षित होतो गोंधळ माजला जातो. सध्याच्या संदर्भात विचार करायचा झाला तर व्यक्तीस्वातंत्र्य आहे या नावाखाली अयोग्य आंदोलने होत आहेत. लोकशाहीत व्यक्ती स्वातंत्र्य अमर्याद असू शकत नाही. दिल्लीत जंतर मंतर वर केलेले आंदोलन सर्व दृष्टीने अयोग्य आणि अनिष्ट होते. वस्तुस्थितीचे योग्य परीक्षण न करता खोटे कथानक पसरवून शासन शासन व्यवस्था उध्वस्त करण्याचे ते एक षडयंत्र होते. बळीराजा पात्र अपात्रतेचा विचार न करता जो मागेल त्याला मागेल ते दान देत असे. दान नेहमी सत्पात्री असले पाहिजे. म्हणून विष्णूने वामनाचे रूप घेऊन बली राजाला पाताळात ढकलले. हा बोध आपण सर्वांनी घ्यायला हवा. भाऊबीज म्हणजे बहिण भावांचे एकमेकांवर असलेल्या प्रेमाचे प्रतीक! पण सध्या स्व केंद्रित वृत्ती आणि स्वैराचार यांचे स्तोम माजले आहे. कुटुंब व्यवस्था खिळखिळी झाली आहे. नातेसंबंध तकलादू होत आहेत. या दृष्टीने एकत्र कुटुंब पद्धतीचे महत्त्व खूप मोठे आहे. पैशाने भौतिक सुख साधने मिळू शकतील पण प्रेम, माया एकमेकांविषयीची आपुलकी या गोष्टी विकत मिळत नाहीत.

दिवाळीची खरेदी करताना हलाल व्यवस्थेला आपण सहाय्य करत नाही ना याची खबरदारी घेऊया. कारण हलाल हे 'हलाहल'आहे. ही एक समांतर अर्थव्यवस्था आहे त्यामुळे हा पैसा थेट आतंकवाद्यांच्या हातात जातो. देश सुरक्षित तरच आपण सुरक्षित म्हणून हलाल व्यवस्था नष्ट होण्यासाठी कसोशीने प्रयत्न करूया

**– श्रीमती संध्या काटदरे**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१० नोव्हेंबर**

१) श्री.दत्तात्रेय जवरू पाटील मु.कुरूळ, अलिबाग, १०-११-१९४२

२) श्री.सुरेश सदाशिव पाटील मु.धामणपाडा, अलिबाग, १०-११-१९४०

३) श्रीम.प्रतिभा आनंद खडपकर चेंढरे-अलिबाग, १०-११-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै. लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग**

## वृद्ध डॉक्टरची फसवणूक

**मुंबई :** सिनिअर सिटीझन कार्डच्या नावाखाली ठगाने एपीके फाईल पाठवून वृद्ध डॉक्टरच्या बँक खात्यावर डल्ला मारला. गेल्या महिन्यात तक्रारदाराला सोशल मीडियावर एक सिनिअर सिटीझन कार्डबाबत एक जाहिरात दिसली होती. त्यांनी संबंधित जाहिरात उघडून त्यातील माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ठगाने त्यांना कार्डच्या नावाखाली एपीके फाईल पाठवून त्यात माहिती अपडेट करण्यास सांगितली. ती एपीके फाईल त्याने उघडली असता त्यात एका बँकेची सिनिअर सिटीझन कार्डबाबत माहिती आली. काही वेळानंतर त्यांच्या मोबाईलचा एक्सेस ठगाने स्वतःजवळ घेतला आणि फसवणूक केली.

# सणांवर नागरी समस्यांचे विरजण

## ■ माणगावात पथदीप बंद, अनियमित पाणीपुरवठा

**| माणगाव | प्रतिनिधी |**

दिवाळीत रोषणाईने परिसर उजळून निघत असताना माणगाव शहरातील अनेक सार्वजनिक रस्ते मात्र अंधाराच्या सावलीत हरवले आहेत. घराघरांत दिवाळीचा उत्साह असला, तरी बंद पथदीप, अनियमित पाणीपुरवठा आणि अस्वच्छतेच्या समस्यांमुळे नागरिकांच्या आनंदावर विरजण पडत आहे. सणासुदीच्या काळातही मूलभूत सुविधांसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने माणगाव नगरपंचायतीच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

दसऱ्याच्या काळातही शहरातील अनेक भाग अंधारात होते. दिवाळीच्या तोंडावर पुन्हा तीच परिस्थिती निर्माण झाल्याने प्रशासनाच्या देखभाल व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मुख्य रस्त्यांपासून अंतर्गत गल्ल्या, चौक आणि छोट्या नाक्यांपर्यंत अनेक ठिकाणी पथदीप बंद असल्याने रात्रीच्या वेळी पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. खांदाड




परिसरातील मराठी शाळेपासून डोंगरे यांच्या निवासस्थानापर्यंतचा रस्ता, अमरदीप हॉस्टेलच्या मागील बाजूपासून बाळा डीजे पॉवर यांच्या निवासस्थानापर्यंतचा मार्ग तसेच मोरबा रोडवरील वेदपाठक यांच्या निवासस्थानापर्यंतचा परिसर अंधारात असल्याचे चित्र आहे. जुन्या होळीच्या मैदानापासून शेलार यांच्या निवासस्थानापर्यंतही काही मोजकेच दिवे सुरू असल्याचे दिसून आले. खांदाडमधील पथदीप सायंकाळी सुरू झाल्यानंतर वारंवार बंद-चालू होत अखेर बंद पडल्याची तक्रार आहे. रात्री उशिरापर्यंत ते पुन्हा सुरू झाले नव्हते. पथदीपांबरोबरच पाणीपुरवठ्याच्या अनियमिततेनेही नागरिक त्रस्त आहेत. गुरुवार, दि.५ नोव्हेंबर रोजी पाणीपुरवठा होणार नसल्याचा संदेश सोशल मीडिया आणि व्हॉट्सअॅप समूहांवर प्रसारित झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला.

मागील काही आठवड्यांपासून निर्धारित वेळेत पाणी मिळत नसल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. याबाबत पाणीपुरवठा सभापती अजित तार्लेकर यांनी पाणी साठवणूक पंपगृहातील यंत्रणेत बिघाड झाल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे काही प्रभागांतील पाणीपुरवठा बाधित झाला. यंत्रणा पूर्ववत करण्यासाठी कर्मचारी चोवीस तास काम करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

दिवाळीसारख्या सणात शहरातील रस्ते, गटारे, सार्वजनिक ठिकाणे आणि अंतर्गत परिसर स्वच्छ असणे अपेक्षित आहे. मात्र, स्वच्छतेबाबतही नागरिकांकडून तक्रारी व्यक्त होत आहेत. सणासुदीच्या काळात विशेष स्वच्छता मोहीम राबवून माणगाव शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची आवश्यकता आहे.

नगरपंचायतीकडून घरपट्टी, पाणीपट्टी आणि अन्य करांची वसुली नियमित केली जाते. नागरिकही आपली आर्थिक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडतात. मग त्या बदल्यात नियमित पाणीपुरवठा, प्रकाशमान रस्ते आणि स्वच्छ परिसर मिळणे हा नागरिकांचा हक्क आहे. नगरपंचायत प्रशासनाने बंद पथदीप तातडीने सुरू करावेत, नादुरुस्त दिव्यांची नियमित तपासणी करावी, पाणीपुरवठा यंत्रणा युद्धपातळीवर पूर्ववत करून निश्चित वेळापत्रकानुसार पाणी द्यावे आणि शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

## निवडक

### डॉ.अब्दुल म्हैसकरांची रुग्णसेवा



**माणगाव :** रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील मोर्बा गावचे सुपुत्र राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त डॉ.अब्दुल कादिर म्हैसकर हे गोरगरीब रुग्णांचे खरे देवदूत आहेत. बहुजन समाजात सामाजिक बांधिलकी व जातीय सलोखा राखून सर्व धर्म समभाव मानून ते काम करीत असतात. डॉ.अब्दुल कादिर म्हैसकर यांनी वैद्यकीय क्षेत्राची होमिओपॅथी एमडी पदवी संपादन केली. ही पदवी संपादन केल्यावर त्यांनी कुर्ला-मुंबई याठिकाणी आपला वैद्यकीय व्यवसाय सुरु केला. याठिकाणी ते विविध आजारांवर उपचार करत आहेत. विशेष म्हणजे डॉ.अब्दुल कादिर म्हैसकर हे ज्या रुग्णांची खरीच आर्थिक परिस्थिती नाही, त्यातच आपल्या मायभूमीतील रुग्ण आपल्याकडे आल्यास त्या रुग्णाला विनामूल्य औषोधोपचार करतात. याचा प्रत्यय अनेक गरीब, गरजू रुग्णांना आला आहे. त्यांच्या मुंबई येथील रुग्णालयात दररोज रुग्णांची मोठी गर्दी असते. रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा मानून काम करणारे रुग्णांचे देवदूत डॉ. अब्दुल कादिर म्हैसकर यांच्या रुग्णालयात परदेशातून, देशातून, विविध राज्यांतून रुग्ण येत असतात. गरीब जनतेचे कनवाळू डॉक्टर म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना या सामाजिक भावनेतून करीत असलेल्या वैद्यकीय सेवेमुळे विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय संस्था, संघटना, मानवी हक्क, सामाजिक न्याय यांच्यातर्फे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आपल्या या वैद्यकीय सेवेचा लाभ माझ्या मायभुमीतील विविध आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांनी घ्यावा, अशी विनंती डॉ. अब्दुल म्हैसकर यांनी केली आहे.



### वडाळे सरोवराजवळ सुरांची बरसात

**खांदेश्वर :** दिवाळीच्या प्रसन्न पहाटे सूर, शब्द आणि भावनांचा अनोखा संगम अनुभवण्याची पर्वणी पनवेलकरांना लाभली. पनवेल महानगरपालिका आणि रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आयोजित नवव्या वर्षाच्या दिवाळी पहाट कार्यक्रमात पेशवेकालीन वडाळे सरोवराचा परिसर स्वरांच्या मैफलीने अक्षरशः भारावून गेला. पहाटे साडेपाच वाजल्यापासून सुरू झालेल्या या कार्यक्रमाला पनवेलकरांनी मोठी उपस्थिती लावली. सुप्रसिद्ध गायिका प्रियांका बर्वे यांनी मराठी भावगीते, लोकप्रिय गाणी आणि मराठी मालिकांची शीर्षकगीते सादर करत रसिकांना जुन्या आठवणींच्या विश्वात नेले. काही गाण्यांवर रसिकांनी ठेका धरला, तर काही सुरांनी मनातील आठवणींना उजाळा दिला. दुसरीकडे सुप्रसिद्ध कवी वैभव जोशी यांनी आपल्या शब्दांतून माणसांच्या जगण्यातील वास्तव उलगडले. घरातील आई-वडील, मुलं, पती-पत्नी यांच्यातील नाती, बदलती कौटुंबिक परिस्थिती, अपेक्षा, गैरसमज आणि न बोलता मनात साठवून ठेवलेल्या भावनांवर त्यांनी केलेल्या हृदयस्पर्शी कवितांनी उपस्थितांना अंतर्मुख केले. काही ओळींनी हास्याची कारंजी फुलवली, तर काही शब्दांनी अनेकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. प्रत्येक कवितेनंतर टाळ्यांचा कडकडाट होत होता.



### आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी

**नवी मुंबई :** आदर्श सेवाभावी संस्थेच्या वतीने खारघर येथील घोळवाडी कातकरी आदिवासी पाड्यात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या पाड्यातील आदिवासी भगिनींना साडी-चोळी, मिठाई आणि दिवाळी फराळाचे वाटप करून अत्यंत उत्साहात भाऊबीज साजरी करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान उपस्थित आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, ''मुलांना चांगले शिक्षण द्या, कारण शिक्षण हा ज्ञानाचा तिसरा डोळा आहे. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कोणताच पर्याय नाही.'' त्यांच्या या मार्गदर्शनामुळे आदिवासी पालकांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. या उपक्रमांतर्गत घोळवाडी कातकरी पाड्यातील एकूण ६५ आदिवासी कुटुंबियांना साडी, चोळी आणि दिवाळीच्या फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच, पाड्यातील लहान मुलांना खाऊ वाटप करण्यात आल्यामुळे बालगोपाळांचा आनंद द्विगुणित झाला. मुलांच्या खाऊसाठी सामाजिक कार्यकर्ते वैभव मोरे यांनी सहकार्य केले.




### आदिवासी बांधवांसोबत दिवाळी पहाट कार्यक्रम

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी आदिवासी बांधवांसोबत दिवाळी पहाट हा कार्यक्रम मागील पंचवीस वर्षापासून आयोजित केला जातो. विकासापासून वंचित असलेल्या समाज घटक दिवाळी सारखा महत्त्वाचा सण आनंदाने साजरा करू शकत नाहीत त्यामुळे दिवाळीत त्यांच्या आनंदाचा भाग व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवला जातो. यावर्षी पिरवाडी आदिवासी कातकरी वाडी येथील बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. याप्रसंगी पिरवाडी आदिवासी कातकरी वाडीवरील महिलांना एकूण बारावारी साडी ०७, सहावारी साडी ७०, पुरुषांना ७५ टॉवेल्स आणि ६० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व स्वच्छता कीडचे वाटप करण्यात आले. तसेच सर्वांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाल्मीक गर्जे यांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी व समाजाप्रती आपलेही काही कर्तव्य आहे ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी तसेच आदिवासी बांधवांचे जीवन विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे प्रतिपादन केले.

# अवघ्या वीस दिवसांच्या बाळाची विक्री

## ■ दहा आरोपींना अटक

**| मुंबई | प्रतिनिधी |**

अवघ्या २० दिवसांच्या नवजात बाळाची पैशांसाठी खरेदी-विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार मुंब्र्यात उघडकीस आला आहे. बाळाच्या आईवर दबाव टाकून त्याचा अडीच लाख रुपयांत सौदा करण्यात आला. मात्र पुढे हेच बाळ वेगवेगळ्या लोकांच्या हातातून जात साडेसहा लाखांच्या व्यवहारापर्यंत पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. मुंब्र्यातून सुरू झालेला बाळाचा प्रवास जालना आणि पुढे रत्नागिरीपर्यंत झाला. या प्रकरणी मुंब्रा पोलिसांनी रत्नागिरीतून बाळाची सुखरूप सुटका केली असून, दहा आरोपींना अटक केली आहे.

कळवा येथील शांतीनगरमध्ये राहणारी अनिसा रफीक शेख ही मुंब्रा रेल्वे स्थानक परिसरात भीक मागते. तिच्या २० दिवसांच्या बाळाची विक्री करण्यासाठी रेहान रिजवान शेख याने दबाव आणल्याचा आरोप आहे. या व्यवहारात अनिसाला एक लाख ९५ हजार रुपये देण्यात आले होते. मात्र, बाळाच्या विक्रीचा प्रकार उघड होऊ नये म्हणून तिच्यावर दबाव टाकत व्यवहाराची रक्कमही लुटल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकारानंतर अनिसाने ५ नोव्हेंबर रोजी मुंब्रा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपासासाठी पाच स्वतंत्र पथके तयार केली. तपासादरम्यान बाळाला मुंब्र्यातून कल्याण आणि दिवा येथे नेत पुढे रत्नागिरीला पोहोचवण्यात आल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी या माहितीच्या आधारे रत्नागिरीत कारवाई करून बाळाला ताब्यात घेतले. बाळाची सुखरूप सुटका झाल्यानंतर या व्यवहारामागील साखळी उघड होऊ लागली. सुरुवातीला अडीच लाख रुपयांत ठरलेला व्यवहार पुढे साडेसहा लाख रुपयांपर्यंत गेल्याचे तपासात समोर आले. या प्रकरणात दहा जणांना अटक करण्यात आली असून, आणखी दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. अटक केलेल्या दहा आरोपींना न्यायालयाने १० नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास मुंब्रा पोलीस करत आहेत.



## ज्येष्ठ नागरिक संघाची दिवाळी पहाट

**नवी मुंबई :** सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने रविवारी (दि.८) संघाच्या कार्यालयात दिवाळी पहाट निमित्ताने सूरमधुर मराठी गीतांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या संगीतमय कार्यक्रमात भजन, भावगीते, कोळी गीते अशा सर्व मराठी गीतांचा सुंदर नजराणा सादर करण्यात आला. याप्रसंगी सर्व कलाकारांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अमृतस्वर कार्यक्रमातील निवेदक नीलेश भेरे, गायिका अमृता भेरे, आदिती राव, सचिन तेली, विनायक घोगळे, मंगेश हांडे तसेच संघाचे कलाकार सुधाकर मिठबावकर, प्रमोद हराळे, राजाराम घोलप, देवदत्त नागपुरे, संतोष जोशी, अरुण शिवदास, विजया हेब्बाळकर, चंद्रकांत पारपिल्लेवार, रत्नप्रभा पारपिल्लेवार या सर्वांनी कार्यक्रमाला रंगत आणली. शेवटी सर्व ज्येष्ठ नागरिकांना संघाच्या वतीने दिवाळी फराळ वाटप करण्यात आला.

# चारित्र्याच्या संशयातून पत्नीची हत्या

## ■ पतीनेही रेल्वेखाली दिला जीव

**| पालघर | प्रतिनिधी |**

नालासोपारा येथे धक्कादायक घटना समोर आली आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने तिची गळा आवळून हत्या केली आणि त्यानंतर स्वतःही रेल्वेखाली जीव दिला. तबस्सुम खान (४१) आणि माजिद खान (५०) असे मृत पती-पत्नीचे नाव आहे. शनिवारी (दि.७) पहाटे घरात झालेल्या वादातून पत्नीची हत्या केल्यानंतर माजिदने दुपारी मुंबईतील ग्रँट रोड रेल्वे स्थानकात आत्महत्या केली.

माजिद आणि तबस्सुम हे आपल्या मुलांसह नालासोपारा पश्चिमेकडील टाकीपाडा परिसरात राहत होते. गेल्या काही दिवसांपासून माजिद पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत होता. याच कारणावरून दोघांमध्ये वारंवार वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे. शनिवारी (दि.७) पहाटे पुन्हा दोघांमध्ये जोरदार भांडण झाले. या वादादरम्यान माजिदचा राग अनावर झाला. त्याने पत्नी तबस्सुम यांचा गळा आवळला. यात त्यांचा मृत्यू झाला. पत्नीची हत्या केल्यानंतर माजिद घरातून निघून गेला. काही वेळाने त्याने मुंबईतील ग्रँट रोड रेल्वे स्थानक गाठले. स्थानकात आलेल्या लोकलसमोर माजिदने उडी घेतली. या घटनेत त्याचाही मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी दोन्ही घटनांचा तपास सुरू केला. पत्नीच्या हत्येप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# इमारतीला आग; चौघे होरपळले

**ठाणे :** घोडबंदर रोडवरील कासारवडवली येथील सांघवी हिल्स परिसरातील आरावली हिल्स या इमारतीच्या सातव्या मजल्यावर रविवारी मध्यरात्री आग लागली. या घटनेत एकाच कुटुंबातील तिघांसह चौघे होरपळले. तसेच आगीच्या धुरामुळे दुसऱ्या फ्लॅटमध्ये अडकलेल्या दोघांची पालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

रविवारी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास आरावली हिल्स सोसायटीच्या ए विंगमधील सातव्या मजल्यावरील कॉरिडॉरमध्ये अचानक आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, ठाणे पालिका आपत्ती विभाग घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तब्बल तासाभरानंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. या घटनेत महेश धस (४६), रीना घस (४६) आणि वेदांत धस (१८) या एकाच कुटुंबातील तिघे किरकोळ भाजले. तर राजेंद्र जोशी (६७) हे जखमी झाले. चौघांनाही उपचारासाठी ठाणे नोबल रुग्णाल यात दाखल करण्यात आले.

# मोरया ग्रुपची सामाजिक बांधिलकी

**| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |**

सामाजिक भावनेतून मोरया ग्रुप, नांदगाव यांच्या वतीने धनत्रयोदशीच्या शुभदिनी नागेश्वर नगर आदिवासी वाडी व आदी आदिवासी वाडीवरील कुटुंबांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. सणांचा आनंद प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचावा आणि आदिवासी बांधवांची दिवाळीही गोड व्हावी, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमासाठी नांदगाव, मजगाव आणि खारीकवाडा येथील नागरिकांकडून चकल्या, चिवडा, लाडू, करंज्या, शंकरपाळे, कडबोळी आदी फराळाचे पदार्थ संकलित करण्यात आले होते. या फराळाचे आदिवासी वाडीवरील ४५ कुटुंबांना वाटप करून त्यांच्या आनंदात दरवर्षीप्रमाणे सहभागी होण्याचा छोटासा प्रयत्न मोरया ग्रुपच्या स्वयंसेवकांनी केला. केवळ फराळाचे वाटप नव्हे, तर आपुलकी, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचा गोडवा या उपक्रमातून अनुभवायला मिळाला. दिवाळीच्या प्रकाशात समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग असावा, हाच संदेश मोरया ग्रुपच्या या स्तुत्य उपक्रमातून देण्यात आला.

# पनवेलमध्ये स्वच्छतेचा जागर

**पालिकेच्या स्वच्छतादूतांकडून शहर चकाचक**

**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**

दिवाळीच्या निमित्ताने पनवेल शहरातील उरण नाका तसेच जुन्या भाजी मार्केट परिसरात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळली होती. विविध भागांतून व्यवसायासाठी आलेले फेरीवाले, फुलविक्रेते, भाजीविक्रेते आणि खरेदीसाठी आलेल्या नागरिकांमुळे बाजारपेठा अक्षरशः फुलून गेल्या होत्या. मात्र, या गर्दीचा परिणाम बाजारपेठेतील स्वच्छतेवरही झाला.

फुलांचे अवशेष, भाजीपाल्याचा कचरा, कागदी खोकी, प्लास्टिक आणि इतर वस्तूंचा कचरा मोठ्या प्रमाणावर रस्त्यांवर साचला



होता. बाजारपेठांमध्ये कचऱ्याचे ढीग निर्माण झाले होते. मात्र, नागरिकांची ही गर्दी ओसरताच पनवेल महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने आपली जबाबदारी चोखपणे पार पाडली. आरोग्य स्वच्छता निरीक्षक अरुण कांबळे आणि महेंद्र भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १२ ते १५ स्वच्छतादूतांच्या पथकाने लक्ष्मीपूजनाच्या रात्रीच स्वच्छता मोहीम हाती घेतली. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या मोहिमेत बाजारपेठा, रस्ते आणि परिसरातील कचरा युद्धपातळीवर उचलण्यात आला. या विशेष मोहिमेत तब्बल ४० टन कचरा गोळा करण्यात आला. मोठ्या प्रमाणावर साचलेला कचरा उचलण्यासाठी खास कचरा संकलन करणारी गाडीही मागविण्यात आली होती. विशेष म्हणजे, फटाक्यांमुळे रस्त्यांवर साचलेला कागद, फटाक्यांचे अवशेष आणि इतर कचराही स्वच्छता कर्मचाऱ्यांनी रात्रीच साफ केला.

दिवसभर नागरिकांच्या सेवेत गजबजलेल्या बाजारपेठा रात्रीच्या काही तासांत पुन्हा स्वच्छ आणि सुंदर झाल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी नागरिकांना स्वच्छ रस्ते आणि मोकळे परिसर पाहायला मिळाले. सणाच्या आनंदात नागरिकांकडून निर्माण होणारा कचरा उचलण्याची जबाबदारी स्वच्छता कर्मचाऱ्यांनी मात्र कोणतीही सुट्टी न घेता पार पाडली.

**कातकरी बांधवांच्या आयुष्यात आनंद | विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राचा उपक्रम**

# दिवाळीच्या फराळातून माणुसकीचा गोडवा

**| माणगाव | प्रतिनिधी |**

विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राच्या वतीने गेल्या सात वर्षांपासून आदिवासी कातकरी बांधवांच्या वाड्यांवर दिवाळी फराळ पोहोचविण्याचा उपक्रम अखंडपणे राबविण्यात येत आहे. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्या जन्मगावी शिरवली आणि पंचक्रोशीतील आदिवासी वाड्यांमध्ये यंदाही ६ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मात्र हा उपक्रम केवळ फराळ वाटण्यापुरता मर्यादित नाही. आदिवासी बांधवांशी आपुलकीचे नाते निर्माण करणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि शिक्षण, आरोग्य व स्वावलंबनासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहणे, हा या सामाजिक



कार्याचा खरा हेतू आहे.

शहरी आणि ग्रामीण भागातील कार्यकर्ते फराळ घेऊन प्रत्यक्ष आदिवासी वाड्यांवर पोहोचतात. या भेटीतून तेथील कुटुंबांचे जीवन, मुलांचे शिक्षण, आरोग्याच्या समस्या आणि रोजगाराच्या अडचणी जवळून समजून घेतात. या संवादातून मदतीचे नव्हे, तर विश्वासाचे आणि आपलेपणाचे नाते निर्माण होत आहे.

गरजू आणि निराधार रुग्णांना आरोग्यविषयक मार्गदर्शन व उपचारांसाठी मदत, आदिवासी महिलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक जनजागृती असे विविध उपक्रमही राबविण्यात येत आहेत. समाजात राष्ट्रीय एकात्मता, जागरूकता आणि सकारात्मक विचार रुजविण्यावर भर दिला जात आहे.

या उपक्रमामागे सुरेश गोखले आणि विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राचे कार्यकर्ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. दिवाळीच्या फराळातील प्रत्येक घासातून प्रेम, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला जात आहे. कातकरी बांधवांच्या मुलांना शिक्षण मिळावे, त्यांच्या मुलींना स्वावलंबनाची संधी मिळावी आणि प्रत्येक कुटुंबाला सन्मानाने जगता यावे, ही या उपक्रमाची खरी भावना आहे. सात वर्षांपासून सुरू असलेली ही चळवळ म्हणजे मदतीचा एक दिवस नव्हे, तर वर्षभर जपले जाणारे माणुसकीचे नाते आहे. कातकरी बांधवांच्या आयुष्यात शिक्षणाचा दीप, संस्कारांची शिदोरी आणि स्वावलंबनाची उमेद निर्माण करणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने माणुसकीचा दिवाळी प्रकाशोत्सव ठरत आहे.

# काळ नदी प्रदूषणाच्या विळख्यात

## || महामार्गाच्या भरावामुळे नदीपात्रात पिवळसर तवंग || नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहराची जीवनदायिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काळ नदीच्या पाण्यावरच आता प्रदूषणाचे संकट ओढवले आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या माणगाव बायपासवरील पुलाच्या कामासाठी नदीपात्रात करण्यात आलेल्या भरावामुळे नदीच्या पाण्याचा रंग पिवळसर झाला असून, नदीपात्रात ठिकठिकाणी पिवळसर तवंग पसरल्याचे चित्र दिसत आहे. या गढूळ पाण्याचा परिणाम शहराच्या पाणीपुरवठ्यावर होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. त्यामुळे माणगावकरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.



मुंबई-गोवा महामार्गाच्या बायपासचे काम सुरू असताना काळ नदीपात्रात पूल उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मातीचा भराव करण्यात आला होता. आता पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर हा भराव काढण्याचे काम सुरू आहे. मात्र, भराव काढताना निर्माण होणारा गाळ आणि मातीमिश्रित पाणी नदीच्या प्रवाहात मिसळून संपूर्ण नदीपात्रात पसरत असल्याचे चित्र आहे. नदीच्या जवळच नगरपंचायतीचे जॅकवेल असल्याने हे गढूळ पाणी पाणीपुरवठ्याच्या स्रोतापर्यंत पोहोचत असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

माणगाव शहरातील विविध भागांतून नळाद्वारे गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. जलशुद्धीकरण केंद्रात पाण्यावर प्रक्रिया केली जात असल्याचे नगरपंचायतीकडून सांगण्यात येत असले, तरी नागरिकांच्या मनात पाण्याच्या शुद्धतेबाबत भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून सध्या नळाद्वारे येणारे पाणी गाळून आणि उकळूनच प्यावे, असे आवाहन नगरपंचायतीमार्फत करण्यात आले आहे.

### नदीत सांडपाणी सोडणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी

संबंधित ठेकेदाराकडून भराव काढण्याचे काम पर्यावरणीय नियमांचे पालन करून केले जात आहे का, याची तपासणी व्हावी. नदीपात्रात गाळ आणि दूषित पाणी मिसळण्यास प्रतिबंध करावा. नदीत थेट सांडपाणी सोडणाऱ्यांवरही कठोर कारवाई करावी. तसेच पाणीपुरवठ्याची नियमित तपासणी करून नागरिकांना पाण्याच्या गुणवत्तेबाबत स्पष्ट माहिती द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

### पाण्याची तपासणी होणे आवश्यक

महामार्गाच्या कामातून निर्माण झालेला गाळ आणि नदीत मिसळणारे सांडपाणी या दोन्ही बाबींची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. नदीचे पाणी नेमके कोणत्या कारणामुळे दूषित झाले, त्यामध्ये गाळाव्यतिरिक्त अन्य घातक घटक आहेत का, तसेच जलशुद्धीकरणानंतर नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचणारे पाणी पिण्यास सुरक्षित आहे का, याची तातडीने प्रयोगशाळेत तपासणी करून अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

याबाबत नगरपंचायतीचे कार्यकारी अधिकारी संतोष माळी यांनी सांगितले की, संबंधित ठेकेदाराला गढूळ पाणी शहराच्या पाणीपुरवठ्यात येऊ नये, यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**नदीकाठच्या गावांना अधिक धोका**

काळ नदीच्या किनारी असलेल्या उतेखोल, विद्यानगर, पोलीस स्टेशन वसाहत, खांदाड, जुने माणगाव, तीनपत्ती नाका, भादाव, बाजारपेठ, मोहल्ला आणि कुंभारवाडा परिसरातील नागरिकांना या परिस्थितीचा फटका बसण्याची शक्यता आहे. विशेषतः काही भागांत थेट पाणीपुरवठा होत असल्याने तेथील नागरिकांकडून गढूळ पाण्याबाबत अधिक तक्रारी येत असल्याचे समजते. काही ठिकाणी नळाला दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याच्याही तक्रारी आहेत. नदीकिनारी असलेल्या काही इमारतींचे सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## निवडक



### टाकाऊ साहित्यातून साकारला रायगड

**खांदेश्वर** : दिवाळी म्हटली की किल्ले उभारण्याचा उत्साह बालगोपाळांमध्ये पाहायला मिळतो. मात्र, सी.बी.डी. बेलापूर येथील संभाजीनगर सेक्टर ८ मधील मुलांनी यंदा या परंपरेला सामाजिक जाणिवेची जोड दिली आहे. परिसरातील होतकरू मुलांनी टाकाऊ साहित्याचा पुनर्वापर करून तब्बल १४ ते १५ फूट लांबीचा भव्य रायगड किल्ला साकारला आहे. या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ ऐतिहासिक वास्तूची प्रतिकृती उभारण्यापुरता मुलांचा प्रयत्न मर्यादित राहिलेला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील रयतेचे संरक्षण, शेतकऱ्यांचा सन्मान, महिलांचा आदर, पाण्याचे नियोजन आणि निसर्गसंवर्धन या मूल्यांची आठवण त्यांनी प्रदर्शनातून करून दिली आहे. त्याचवेळी आजची वाढती वृक्षतोड, डोंगरांचे होणारे नुकसान, पाणीटंचाई, शेतकऱ्यांच्या समस्या आणि महिलांच्या सुरक्षेचे प्रश्नही मांडण्यात आले आहेत. या उपक्रमाबाबत अष्टविनायक मोरे यांनी ऐतिहासिक परंपरा जपण्याचे आवाहन केले. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि स्वराज्याची शिकवण पुढील पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. संभाजीनगरमधील लहान-मोठ्यांनी दरवर्षी दिवाळीत किल्ले उभारण्याच्या परंपरेत सहभागी व्हावे. मुलांच्या कल्पकतेला प्रोत्साहन देऊन त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.



● (छायाचित्र : संजय गायकवाड)

### आदिवासी कुटुंबांना फराळाचे वाटप

**कर्जत** : कोठारी क्लासेस, कर्जत यांच्या वतीने रविवार (दि.८) दिवाळीनिमित्त वदप आदिवासी वाडी, संजयनगर आदिवासी वाडी (वदप) आणि नांगुर्ले आदिवासी वाडी येथे सुमारे ३०० आदिवासी कुटुंबांना दिवाळी फराळ व मिठाईचे वाटप करण्यात आले. तसेच वाडीतील सर्व लहान मुला-मुलींना लाडू व बिस्किटांचे पुडे देण्यात आले. या उपक्रमातून आदिवासी बांधवांसोबत दिवाळीचा आनंद उत्साहात आणि आपुलकीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कोठारी क्लासेसच्या टी.वाय.बी.कॉमच्या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या सामाजिक उपक्रमाचे हे बारावे वर्ष आहे. गेली बारा वर्षे सातत्याने हा उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य कोठारी क्लासेसतर्फे केले जात आहे. या फराळ वाटप उपक्रमासाठी सी.ए. राकेश धीरजलाल शाह (कांदिवली), राजेश रसिकलाल शाह (नेरळ), किरीट ऊर्फ बकाशेठ शाह, माजी नगरसेवक उमेश गायकवाड, संदीप पाटील, सुभाष पाटील, कैलास पोटे, जयवंत म्हसे, डॉ. प्रशांत सदावर्ते, संजीव ठाकरे आणि प्रशांत उगले यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या या मोलाच्या योगदानाबद्दल कोठारी क्लासेसतर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

### दिवाळीच्या खरेदीतून सामाजिक सेवा

**पाली/बेणसे** : सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेने दिवाळीनिमित्त विविध वस्तू विक्रीसाठी ठेवल्या आहेत. या माध्यमातून मिळणारा संपूर्ण नफा आपत्कालीन बचाव कार्यासाठी वापरण्यात येणार आहे. संस्थेच्या वतीने उभारण्यात आलेल्या या स्टॉलवर नागरिकांसाठी विविध प्रकारच्या वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये: आकर्षक दीप व पणत्या, सुंदर व पारंपरिक कंदील, दिवाळी तोरण व विविध सजावटीच्या वस्तू आणि इतर आवश्यक दिवाळी साहित्य आहे. या विक्रीतून होणाऱ्या व्यवहारातून मिळणारा नफा थेट संस्थेच्या आपत्कालीन बचाव व मदत मोहिमांसाठी वापरला जाणार आहे. पूरस्थिती, रस्ते किंवा इतर अपघात, नैसर्गिक आपत्ती तसेच संकटकाळात किंवा आपत्कालीन परिस्थितीत अडकलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी या जमा होणाऱ्या निधीचा उपयोग केला जाणार आहे. या उपक्रमाबाबत बोलताना संस्थेचे पदाधिकारी सागर दहिंबेकर यांनी सांगितले की, आपल्याकडे अनेकदा सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. परंतु संकटाच्या काळात समाज म्हणून एकत्र उभे राहणे तितकेच महत्त्वाचे असते. या स्टॉलमधून नागरिक जे साहित्य खरेदी करतील, त्यातून मिळणारा नफा आमच्या वन्यजीव व आपत्कालीन बचाव पथकाच्या उपयोगाला येईल. पूरस्थिती असो किंवा एखादी दुर्घटना, आपत्तीच्या काळात वेळेवर मदत पोहोचवण्यासाठी या निधीचा मोठा आधार मिळणार आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली दिवाळी अर्थपूर्ण बनवावी आणि सामाजिक सेवेच्या या यज्ञामध्ये हातभार लावावा, असे आवाहन सागर दहिंबेकर यांनी केले आहे.

### बशीर पठाण यांचे निधन

**नागोठणे :** नागोठण्याजवळील गोडसई गावातील रहिवासी बशीर रहीम पठाण (६०) यांचे शुक्रवारी (दि.६) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. पाटणसई ग्रामपंचायतीचे माजी तंटामुक्त अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्ते अकबर पठाण यांचे ते मोठे बंधू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन भाऊ, विवाहित बहिणी यांच्यासह मोठा परिवार आहे. बशीर पठाण स्वभावाने प्रेमळ व मनमिळाऊ होते. बशीर पठाण यांच्या अकस्मात निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- घरकामासाठी अर्धवेळासाठी बाई पाहिजे. पगार- ५००० रुपये, संपर्क : ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- शिवानी पेटशॉप अलिबाग/चोंढी/पेण येथे कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. संपर्क : ९२७२३८३४७६
- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- घर कामाला बाई/मुलगी पाहिजे. महिना पगार-१२,०००/- दिला जाईल. इच्छुक असणाऱ्याने खाली दिलेल्या नंबरवर कॉल करा. ७८७५७४७५३२, ८८०६१४९४२८. पत्ता - किहीम बीच, अलिबाग, रायगड ४०२२०८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## बच्चे कंपनीने साकारला मल्हारगड

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

पाथरशेत येथील बच्चे कंपनीने मल्हारगड साकारून परिसरातील नव्हे तर अन्य गावातील अनेकांना आकर्षित केले आहे. तटबंदी, मावळ्यांची ठिकठिकाणी फौज, शिवरायांचा आकर्षक पुतळा, भगवे झेंडे ठेवण्यात आले आहेत. या मल्हारगडाच्या रूपाने अनेकांना याची माहिती मिळत आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना दिवाळीची सुट्टी लागल्यानंतर येथील बच्चेकंपनी एकत्र येऊन मल्हारगड साकारण्याचा निश्चय केला. यासाठी गावातील



ज्येष्ठ नागरिकांनी त्यांना मार्गदर्शन केले. मल्हारगड उभारून शिवाजी महाराजांचा इतिहास आणि गड किल्ल्यांची माहिती तसेच वारसा जपण्याचा लहानग्यांनी विशेष प्रयत्न केल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

## चिमुकल्यांनी साकारली किल्ले रायगडाची प्रतिकृती

**| नेरळ | प्रतिनिधी |**

हालीवली गावातील चिमुकल्यांनी एकत्र येत छत्रपती शिवाजी महाराज यांचा ऐतिहासिक रायगड किल्ला बनवण्यात आला आहे. हा किल्ला पाहण्यासाठी परिसरातील बच्चे कंपनी येत आहे.

हालीवली गावातील संतोष रंभाजी बोराडे यांच्या परिवारातील लहान-मोठ्या मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या ऐतिहासिक रायगड किल्ल्याची प्रतिकृती बनवली आहे. गेली १० वर्ष ही



मुले किल्ला बनवत असून किल्ला बनवायला घरातील सगळी लहान मोठी मदत करतात. चिमुकल्यांनी ऐतिहासिक रायगड किल्ल्याच्या प्रतिकृती साकारून शिवरायांच्या इतिहासाला अनोखी मानवंदना दिली आहे.

बोराडे पुढच्या पिढीकडे ही परंपरा नेण्याचे कार्य सुरू ठेवले आहे. चिमुकली बालके यांनी छत्रपती शिवाजी महाराजा यांच्या किल्याबद्दल माहिती होईल असे कार्य सुरू ठेवले आहे. या लहान मुलांनी आपल्या कल्पकतेतून चिमुकल्यांनी मेहनत, जिद्द आणि कलात्मकतेच्या जोरावर रायगड किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती तयार करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या किल्ल्याच्या प्रतिकृतीतून मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाविषयी असलेली आवड आणि गड-किल्ल्यांप्रती असलेला आदर व्यक्त केला आहे. लहान वयातच मुलांनी दाखवलेली ही कलाकुसर कौतुक होत आहे.

आजच्या डिजिटल युगात मुलांनी आपल्या ऐतिहासिक वारशाची जपणूक करण्यासाठी घेतलेला हा पुढाकार निश्चितच प्रेरणादायी आहे. चिमुकल्यांच्या या कलाकृतीतून शिवरायांच्या इतिहासाचा अभिमान पुन्हा एकदा जागा झाला आहे.

## बालगोपाळ रंगले किल्ले बनवण्यात

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील पिंपळोली गावामध्ये ७० विद्यार्थ्यांकडून पर्यावरणपूरक किल्ले साकारण्यात आले आहेत. बालगोपालांनी एकत्र येत गावात वेगवेगळ्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील ४० गड-किल्ले साकारले आहेत. दरम्यान, दहा दिवस मोबाईलच्या व्यसनापासून दूर राहत बनवलेले किल्ले सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. तर जाणता राजा गडकिल्ले स्पर्धेला पिंपळोली गावातील बालगोपाल आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.



महाराजांचा इतिहास सांगणारे गड-किल्ले दिवाळी सणाच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रभर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सहभाग घेत बनवले जातात. कर्जत तालुक्यातील पिंपळोली गावामधील ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत ४० गड किल्ले एका गावामध्ये साकारले आहे. या स्पर्धेचे आयोजन जाणता राजा गडकिल्ले पिंपळोली यांच्याकडून करण्यात आले आहे. यांच्या माध्यमातून उत्कृष्ट गडकिल्ल्यांना पारितोषिक देण्यात येणार आहे. आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांच्या हातात वेळोवेळी मोबाईल पाहायला मिळत आहे. त्यातच स्पर्धेसाठी दहा दिवस मुलांनी मेहनत घेतली असून गडकिल्ले बनवण्यासाठी मग्न झाले.

असंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेत नुसते गडकिल्ले साकारले नाहीत, तर छत्रपती शिवाजी प्रत्येक गड-किल्ल्याचा इतिहास त्यांच्याकडून सांगण्यात आला. महाराजांचा इतिहास जागृत करत पिंपळोली गावांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## १२०० पणत्या लावून दीपोत्सव साजरा

**| आंबिवली | प्रतिनिधी |**

प्रेरणा जल्लोष आणि रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री स्वामी समर्थ महाराज मठ, आळी आंबिवली येथे १२०० पणत्या लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला.



भारतीय सैन्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'प्रत्येक सैनिक-एक पणती' हा उपक्रम यंदाही सैनिकांना मानवंदना देऊन साजरा करण्यात आला. देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र झटणाऱ्या प्रत्येक जवानाच्या त्यागाला आणि शौर्याला ही एक पणती अर्पण करण्यात आली. याप्रसंगी रोटरी क्लबचे सचिव नागेश कदम आणि रोटरीचे सदस्य, तसेच प्रेरणाचे ओंकार काका आणि त्यांची संपूर्ण टीम, तसेच श्री स्वामी समर्थ महाराज मठ, आळी आंबिवली येथील केदार भोईर आणि सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. १२०० पणत्यांच्या प्रकाशाने संपूर्ण मठ परिसर उजळून निघाला होता. भक्तिमय वातावरणात साजरा झालेला हा दीपोत्सव देशभक्ती आणि आध्यात्मिकतेची नवी प्रेरणा देऊन गेला.

## गीता पालरेंची अध्यक्षपदी निवड

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कार्यकाळासाठी संस्थेच्या नव्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. ही पंचवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया १८ ऑक्टोबर रोजी पार पडली. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदी गीता पालरेचा, उपाध्यक्षपदी रविंद्र लिमये, सचिवपदी ग. रा. म्हात्रे, तर कार्यवाहपदी महेश ओसवाल यांची बहुमताने निवड करण्यात आली. या निवडीमुळे संस्थेच्या आगामी पाच वर्षांच्या कामकाजाची जबाबदारी नव्या पदाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहे. यावेळी संस्थेच्या कामकाजासह विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. मागील वर्षी रोहा तालुक्यातील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शाळा वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट, सुतारवाडी या संस्थेकडे हस्तांतरित करण्यासंदर्भात ठराव मंजूर करण्यात आला होता. या पूर्वीच्या ठरावाला आजच्या सर्वसाधारण सभेत एकमताने मंजुरी देण्यात आली. त्यामुळे शाळा हस्तांतरणाचा विषय सभेतील महत्त्वाचा निर्णय ठरला. यावेळी संस्थेचे सुमारे २५० सभासद उपस्थित होते. संपूर्ण निवड प्रक्रिया आणि वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

## दिवाळीच्या परंपरेतून शिवइतिहासाचा जागर

■ मांडवा ग्रुपच्या मुलांनी साकारला सिंहगड किल्ला

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत येथील डेक्कन जिमखाना परिसरातील मांडवा ग्रुपच्या मुलांनी सिंहगड किल्ल्याची भव्य आणि आकर्षक प्रतिकृती साकारली आहे. केवळ मातीचा किल्ला उभारण्यापुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता, त्यातून शिवकालीन इतिहास, गड-किल्ल्यांचे महत्त्व आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या मुलांनी केला आहे.

या किल्ल्याच्या निर्मितीसाठी मुलांनी माती, दगड आणि चिखल अशा नैसर्गिक साहित्याचा वापर केला आहे. सिंहगडाची रचना, तटबंदी आणि परिसराचे स्वरूप जपण्याचा प्रयत्न करत किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा, गड चढणारे मावळे, शत्रूशी लढणारे सैनिक, तोफा



● (छायाचित्र : संजय गायकवाड)

आणि मातीचे सैनिक अशा विविध गोष्टींची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे किल्ल्याच्या पायथ्याशी असलेले गाव, भाजी मंडई आणि तत्कालीन जनजीवनाचे चित्रही मुलांनी कल्पकतेने उभे केले आहे. त्यामुळे ही प्रतिकृती केवळ किल्ल्याचे दर्शन घडवत नाही, तर शिवकालीन वातावरणाची अनुभूतीही देते.

विशेष म्हणजे भावी पिढीला सिंहगडाची ऐतिहासिक माहिती मिळावी, या उद्देशाने किल्ल्याच्या परिसरात माहिती फलकही लावण्यात आला आहे. तसेच शेजारी छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र लावून या उपक्रमाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान देण्यात आले आहे. त्यामुळे किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्यांना सिंहगडाच्या इतिहासाची माहिती मिळण्यास मदत होत आहे.

**सातासमुद्रापार शिवरायांचा जयघोष** | **पवार, कोळंबकर कुटुंबियांनी जपली परंपरा**

# ऑस्ट्रेलियात साकारला शिवकालीन 'वेरिंगड' किल्ला

**| माणगाव | प्रतिनिधी |**

महाराष्ट्राची माती, छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास आणि मराठी संस्कृतीशी असलेली नाळ किती घट्ट असते, याचा हृदयस्पर्शी प्रत्यय थेट सातासमुद्रापार ऑस्ट्रेलियात पाहायला मिळाला आहे. हजारो किलोमीटर दूर परदेशात वास्तव्य असतानाही आपल्या संस्कृतीचा अभिमान आणि परंपरेची ओढ मनात जपणाऱ्या माणगावच्या पवार कुटुंबियांनी दिवाळीनिमित्त शिवकालीन किल्ल्याची देखणी



प्रतिकृती साकारत मराठी अस्मितेचा भगवा अभिमानाने फडकवला आहे.

ऑस्ट्रेलियातील वेरिंग्टन येथे माणगाव शहरातील साईनगर पश्चिम, कालवा रोड येथील विनिता आणि तुषार पवार कुटुंबीय तसेच कोळंबकर कुटुंबीय यांच्या एकत्रित प्रयत्नांतून या शिवकालीन किल्ल्याची निर्मिती करण्यात आली. आपल्या वास्तव्याच्या ठिकाणाच्या नावावरून या किल्ल्याला मोठ्या अभिमानाने 'वेरिंगड' असे नाव देण्यात आले आहे. या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरली ती पवार कुटुंबातील चिमुकली जिझा आणि राया! लहानग्या हातांनी किल्ल्याच्या निर्मितीत सहभागी होत या बालचिमुकल्यांनी केवळ एक देखणी कलाकृती साकारली नाही, तर आपल्या मातृभूमीचा इतिहास आणि संस्कृती अनुभवण्याचा एक सुंदर संस्कारही आत्मसात केला. किल्ल्याच्या उभारणीत कोळंबकर कुटुंबियांनीही मोलाची साथ दिली. एकत्रित कुटुंबभावना, शिवरायांवरील श्रद्धा आणि मराठी संस्कृतीवरील प्रेम यातून 'वेरिंगड' आकाराला आला.

गड-किल्ल्यांच्या माध्यमातून स्वराज्याचा इतिहास, मावळ्यांचा पराक्रम, शौर्य आणि त्याग नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची ही परंपरा अनेक पिढ्यांपासून जपली जात आहे. हीच परंपरा आता परदेशातील भूमीवरही तितक्याच आत्मीयतेने जपली जात आहे. आपली मुले परदेशात वाढत असली, तरी त्यांच्या मनात महाराष्ट्राचा इतिहास, मराठी भाषा, सण-उत्सव आणि शिवरायांच्या विचारांविषयी प्रेम व अभिमान निर्माण व्हावा, या उदात्त भावनेतून दोन्ही कुटुंबियांनी हा उपक्रम साकारला.

### परदेशात राहूनही शिवइतिहासाची ओढ

या किल्ल्याची माहिती परिसरातील मराठी बांधवांपर्यंत पोहोचताच धनत्रयोदशीच्या दिवशी अनेक मराठी कुटुंबीयांनी आवर्जून भेट देत किल्ल्याचे कौतुक केले. परदेशात राहूनही आपल्या सणांची, परंपरांची आणि शिवइतिहासाची ओढ मनात किती जिवंत आहे, याचे दर्शन या भेटींमधून घडले. मराठी बांधवांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे पवार आणि कोळंबकर कुटुंबियांचा आनंद द्विगुणित झाला.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन व घर मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक (१) आर्यन प्रवीण नार्वेकर, (२) प्रतिमा प्रवीण नार्वेकर यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

:: मिळकतीचे वर्णन ::

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) | खाते क्रमांक |
|---|---|---|---|---|
| नागाव | २९१/२ | ०-२१-३०<br>०-०१-००<br>०-२२-३० | ५.०७/- | ३४५८ |

सदर मिळकतीपैकी (१) आर्यन प्रवीण नार्वेकर, (२) प्रतिमा प्रवीण नार्वेकर यांचे मालकीची ०-१०-५० हे. आर. क्षेत्रफळ असलेली जमीन व त्यावरील ग्रामपंचायत नागाव मालमत्ता क्रमांक २४२८, २७०२ या दोन घर मिळकती,

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०८/११/२०२६
मान्यतेची सही
(१) आर्यन प्रवीण नार्वेकर
(२) प्रतिमा प्रवीण नार्वेकर

सही /-
**ॲड. सचिन सदानंद पाटील**
पत्ता : कुरूळ, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबाईल नं. : ९८८१६३७९२४/
७९७२७७९९०२

### जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल सुनंदा मदन पाटील रा. पनवेल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचा बोलणी विद्यमान मालक सतिश रामचंद्र मांडवकर, रा. ताडवागळे यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन :-

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ताडवागळे ता.अलिबाग | २९ | क्षेत्र ०-३१-४०<br>पो.ख. ०-०४-००<br>एकुण ०-३५-४० | ८.१२ |

वर नमुद केलेली मिळकत ही या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या २१ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी (पळी आंबेघर) पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

### जाहीर सुचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील १) कु. विनोद बाळाराम म्हसे २) श्वेताश्री मुखर्जी दोघेही राहणार टॉवर ४, फ्लॅट २४०२ ब्लुरीज टाउनशिप, हिंजवडी फेज-१ पुणे वाकड ४११०५७ यांनी खालील नमूद शेतजमिन मिळकत त्याचे मालक १) कु. अमित ललित जैन रा जोगेश्वरी ईस्ट, मुंबई, महाराष्ट्र ४०००६० २) कु. प्रथमेश रोहिदास मोरे ३) श्रीमती. मेधा माधव सुगवेकर दोघेही राहणार रा. नेरळ ता. कर्जत जि. रायगड यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे. वाकस, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. | आकार पै |
|---|---|---|---|---|
| ६४ | २ | ०-४७-८०<br>पो.ख.०-०३-८०<br>एकूण ०-५१-६० | ४ | ४४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दिनांक १० नोव्हेंबर २०२६

**ॲड. प्रांजली प्रथमेश मोरे**
एम.ए.एल्एल् बी.
अधिवक्ता एन्रोलमेंट क्रमांक (एमएएच/५०८१/२०२१)
७, तळ मजला, जय नारायण कॉम्प्लेक्स,
अंबिका नाका, मु.पो. नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री.कृष्णकांत यशवंत दरेकर कडून कायमची खरेदी करण्याच्या विचारात आहोत. तरी नमूद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मौजे पळसदरी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत.**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र. हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| पळसदरी | ६/३/अ | ०.२७.६० | ४.०० |

सदरची जमीन मिळकत पैकी दोन गुंठा ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत पैकी दोन गुंठा या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे विचारात आहोत. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती पैकी दोन गुंठा संदर्भात इतर कोणाचाही दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्यूपत्रांकीतदान, कुळवहिवाट, बोजा वगैरे गहाण, प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक :-०९/११/२०२६

**ॲड. कमलेश शिवधारी पाल**
बी.ए.एल.एल.बी.
घर नं.१७६, विश्वनगर, गुंडगे,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१.

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे थळ तालुका अलिबाग, जि. रायगड येथील निम्मलिखीत वर्णनाची बागायत जमिन ही सौ.सुजाता संजय जोशी रा. ओमसागर सोसायटी, ब्राम्हणआळी अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड यांचे खुद्द मालकीची आहे. सदर जमिन मिळकत ही माझे अशिल यांनी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची विक्री व्यवहाराची प्राथमिक बोलणी विद्यमान मालक व माझे अशिलांमध्ये झालेली आहे. सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे कायदेशीर हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती बाबत साठेकरार, बयाणापावती, तारण, गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत अगर कोणत्याही मार्गाने गुंतविलेली असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर अथवा रजिस्टर्ड पोस्टाने किंवा प्रत्यक्ष भेटून कळवाव्यात. जर वरील मुदतीत कुणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर जमिन मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून मागाहून आलेल्या हरकती जाणीवपूर्वक सोडून दिलेल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल सदरहू जमिन मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. यांची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| थळ<br>ता.अलिबाग<br>जि.रायगड | ११७/३/ब | ०.०१.५०<br>पो.ख. ०.००.५०<br>एकूण क्षेत्र ०.०२.००<br>एकूण क्षेत्र ०.०२.०० | ०.५८ |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०९/११/२०२६

**ॲड. विवेक संजय जोशी**
रा.अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.
मो.नं. ८८८८९१८१००.

### पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/
प्र.क्र.१४/३८१/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०६/११/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री/श्रीमती.
मा.सदस्य/ सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र.१४, गुरुवार दिनांक १९/११/२०२६ रोजी, सकाळी ११:०० वाजता, महापालिकेच्या 'आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक १४, दिनांक १९/११/२०२६ ची विषयपत्रिका**

१. मागील सर्वसाधारण सभा क्र. ११ दिनांक १५/१०/२०२६ तसेच सभा क्र.१२ दिनांक २३/१०/२०२६ रोजीच्या सभांचे इतिवृत्त कायम करणे.
२. शासकीय पत्रव्यवहार
३. प्रश्नोत्तरे
४. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :
१. कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वर्ग-१ या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती करणेबाबत.
२. पनवेल महानगरपालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचारी (कंत्राटी कर्मचारी वगळून) यांना त्यांचे कुटुंबियासह वैद्यकीय आरोग्य विमा स्वरुपात सुरु करणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती क्षेत्र, २९ गावे व त्यामधील वाडी वस्तीवर सेवा संकल्प अभियान अंतर्गत वैद्यकिय आरोग्य शिबिर आयोजित करणे व त्याकरिता येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
४. महिलांच्या मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता राखणेकामी पालिका क्षेत्रातील महिला व मुलींसाठी Santary Pad Vending Machine व Incineator Machine खरेदी करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
५. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिका मलनि:सारण विभागामार्फत मराठी शाळांची शौचालयांची दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे या कामाच्या प्रस्तावास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील प्रभाग क्र. १९, प्रभाग समिती 'ड' मार्केट यार्ड रस्ता अं.भु.क्र.२८४ ते ४८६, अं.भु.क्र. २७२ ते ४७८, अं.भु.क्र. २७७ ते ४७०, अं.भु.क्र.४७० ते २८०/१, अं.भु.क्र. ४७१ ते ४७२ व अं.भु.क्र. ४५९ ते ४९० पर्यंत पावसाळी गटार व रस्ता काँक्रीटीकरण करणे.
७. पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल (पूर्व), भुखंड क्र.२८, सेक्टर -१९ मधील किक्रेट मैदानावर नवीन हिरवळ लागवड करणे व यंत्रसामुग्री खरेदी करणे.
८.पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - क, प्रभाग क्र. १५, खांदा कॉलनी मधील प्लॉट नं.०१, सेक्टर १०, इंद्रप्रस्थ को.ऑप.हौ. सोसायटी समोरील रस्ता ते प्लॉट नं.०२, सेक्टर-११, सी.के.टी.कॉलेज जवळील रस्ता काँक्रीटीकरण व पावसाळी गटार बांधणे.
९.पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१७, पनवेल येथील साई बाबा मंदिर ते हॉटेल आर्या (स्टेशन रोड) व अं.भु.क्र. ४१३/३ ते अं.भु.क्र. २ (संत सावतामाळी हॉल) येथील रस्ता काँक्रीटीकरण करणे.
१०. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती- क्र. प्रभाग क्र.१५, खांदा कॉलनी मधील सेक्टर- ०८, प्लॉट नं.१५, साई शरण सोयासटी समोरील रस्ता ते सेक्टर-६, प्लॉट नं.१२ अ/ब आगरी शिक्षण संस्था प्राथमिक शाळेजवळ नाल्यापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व पावसाळी गटार बांधणे.
११. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड, प्रभाग क्र. १७ मधील इच्छापुर्ती गणेश मंदिर ते भाग्यलक्षी अपार्टमेंट पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. या कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.
१२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील पालेखुर्द गावातील रा. जि.प.मराठी शाळा ते चिंध्रन गावाकडे जाणाऱ्या स्मशानभूमी पर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.
१३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ब, प्रभाग क्र.०३ मधील खारघर येथील ओवे पेठ गावात नव्याने व्यायामशाळा बांधणे.

(मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

सही/-
**नानसाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- ०६/११/२०२६.
**सोबत :-** विषयांचे गोषवारे व सर्वसाधारण सभा क्र.११ दिनांक १५/१०/२०२६ तसेच सभा क्र. १२ दिनांक २३/१०/२०२६ रोजीच्या सभांचे इतिवृत्त.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटपपत्र/करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | उलवे १९१ | गव्हाण १२१ | ३६५/१३A<br>२४३/३<br>३६५/२A<br>+१५<br>१००/१<br>३९३/० | ०-४१-०<br>०-११-०<br>१-०६-३<br>०-०५-०<br>०-४७-० | १८५० चौ.मी. पैकी १८०९.८६ चौ.मी. वाटप व ४० चौ. मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. ३३९D, सेक्टर-१९, क्षेत्र-४० चौ.मी. | **कै. गजानन काशिनाथ देशमुख (मयत), कै. गुलाबराव गजानन देशमुख (मयत) कै. अंजनी गोपाळ सुर्यराव (मयत) व कै. रतन उर्फ रत्नाबाई हनुमंत सुर्यराव (मयत) यांच्या वारसांपैकी**<br>श्री. रविंद्र मोरेश्वर सूर्यराव व श्रीमती सविता रविंद्र बागराव | आर.सी.एस. क्र.१०/२००८<br>एस.सी.एस. क्र. १०५/१९९५<br>सिव्हील अपील क्र.१००/२००१ |
| **नोड-द्रोणागिरी** | | | | | | | | |
| २ | १२०७ | चाणजे ५० | १४४/१बी | ०-७०-७ | ६१८.६२ चौ.मी. पूर्णाकात ६०० पैकी ५०० चौ.मी. | नोड-द्रोणागिरी, सेक्टर-५४, भूखंड क्र.२९बी, क्षेत्र ५०० चौ.मी. प्रस्तावित | मूळ भूधारक **कै. कमळी हिराजी म्हात्रे** यांचे पुन्हा दिवाणी न्यायालय, उरण यांचेकडून CMA No. २४०/२००७ नुसार भूधारकांनी वारस दाखला सादर केलेला आहे. तसेच न्यायालयीन हिस्सेवाटणीबाबत रे.मु.नं. ६७/२०१६ नुसार दिवाणी चौकशी अर्ज सादर केलेला असून सदर दिवाणी चौकशी अर्जामध्ये कै. **कमळी हिराजी म्हात्रे** यांचे वारस :<br>**श्रीमती कृष्णाबाई धाकल्या तांडेल** हया असून, दि. २१.१२.२००३ रोजी मयत झालेल्या असून त्यांचे वारस :<br>**१) श्री. भालचंद्र धाकल्या तांडेल** हे दि. ०१.०९.२०१४ रोजी मयत असून त्यांचे वारस :<br>**१:१) श्रीमती शोभना भालचंद्र तांडेल**<br>**१:२) श्री. सागर भालचंद्र तांडेल**<br>**२) श्री. हरेश ऊर्फ हरिष धाकल्या तांडेल**<br>**३) श्री. किशोर धाकल्या तांडेल**<br>**४) श्री. भगवान धाकल्या तांडेल** हे दि. ०७.०३.२०१९ रोजी मयत झाले असून त्यांचे वारस :<br>**४:१) श्री. विमल भगवान तांडेल**<br>**४:२) श्री. चिराग भगवान तांडेल**<br>**५) श्रीमती मालती धाकल्या तांडेल ऊर्फ मालती मनोहर पाटील**<br>**६) श्रीमती भारती धाकल्या तांडेल ऊर्फ भारती मनोज पाके** यांची नावे वारस म्हणून घोषित करण्यात आलेली आहेत. | तसेच उरण येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे कोर्टातील रे.मु.क्र.६७/२०१६ या दाव्यातील झालेल्या निशाणी क्र. ८८ कडील न्यायनिर्णय व निशाणी क्र. ८९ कडील हुकूमाप्रमाणे व नोंदणीकृत हक्कसोडपत्र उरण दस्त नं. ३८६९-२०२५ प्रमाणे विभागणी झालेली आहे. सदर हिस्से वाटणी खालीलप्रमाणे आहेत.<br>१) श्री. किशोर धाकल्या तांडेल वादी यांचे लाभांत १०० चौ.मी.<br>२) श्रीमती मालती धाकल्या तांडेल व श्री. मनोहर जनार्दन तांडल यांचे लाभांत १०० चौ.मी.<br>३) श्री. हरेश ऊर्फ हरिष धाकल्या तांडेल<br>४) श्री. विमल भगवान तांडेल व श्री. चिराग भगवान तांडेल (मयत) यांचे लाभांत १०० चौ.मी.<br>५) श्रीमती शोभना भालचंद्र तांडेल व श्री. सागर भालचंद्र तांडेल यांचे लाभांत १०० चौ.मी.<br>६) सौ. भारती धाकल्या तांडेल ऊर्फ भारती मनोज पाके<br>अ.क्र. ३ ते ६ भूधारकांनी स्वत:चे हक्क उरण येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे कोर्टातील रे.मु.क्र.६७/२०१६ या दाव्यातील झालेल्या निशाणी क्र. ८८ कडील न्यायनिर्णय व निशाणी क्र. ८९ कडील हुकूमाप्रमाणे व नोंदणीकृत हक्कसोडपत्राद्वारे उरण दस्त नं. ३८६९-२०२५ प्रमाणे विभागणी झालेली आहे. सदर हक्कसोडपत्राद्वारे अ.क्र. १ यांच्या लाभांत केलेले आहेत |
| | | | **एकूण** | ०-७०-७ | | | | |
| **नोड-उलवे** | | | | | | | | |
| ३ | करंजाडे-७४९ | कोपर ३४ | ४६/२ | ०-०२-० | ४० चौ. मी. | नोड-उलवे सेक्टर क्र.१९, भूखंड क्र.३३९E, क्षेत्र ४० चौ.मी. | **कै. कोंडू उर्फ कुंड्या बाळू घरत (मयत) (मृत्यू दि. १४.०४.१९७१) यांचे वारस (वारस दाखला क्र.** CMA ६१०/२०१८)<br>१. श्री. कृष्णा कोंडू उर्फ कुंड्या घरत | सक्षम न्यायालयाने घोषित केलेल्या वारसांपैकी पात्र भूधारक<br>**श्री. कृष्णा कोंडू उर्फ कुंड्या घरत** यांच्या नावे भूखंड वाटपाचे प्रस्तावित आहे.<br>**हक्कसोडपत्राची माहिती:**<br>सदर संचिकेमध्ये हक्कसोडपत्र निरंक आहे.<br>**न्यायालयीन दाव्यांची माहिती:**<br>१) एस.सी.एस. क्र. २६७/२०२३ (दिग्विजय संजय शेळके विरुद्ध कृष्णा कोंडू उर्फ कुंड्या घरत): भूखंड खरेदी-विक्री कराराच्या पूर्ततेकरिता दाखल दावा तडजोड पूरशिसद्वारे हुकूमनामा पारीत होऊन दि. ०९/०९/२०२३ रोजी निकाली झालेला आहे. हुकूमनाम्यात मौजे कोल्ही कोपर येथील सर्व्हे क्र. ४६/२ च्या मोबदल्यापोटी ४० चौ.मी. भूखंड वादी दिग्विजय संजय शेळके याना देण्याचे मान्य केले आहे. (पृ.क्र. १४३/प ते १५५/प)<br>२) ॲड. कुणाल म्हात्रे यांनी दि. २८/११/२०२३ रोजी दिग्विजय संजय शेळके यांचेवतीने सर्व्हे क्र. ४६/२ मायत हरकत नोटिस (दावा दाखल करण्यापूर्वीची) दिलेली आहे.<br>३) याव्यतिरिक्त संचिकेत व सिडकोच्या Legal Tracking Systern मध्ये कोणताही दावा अथवा मनाई हुकूम नाही. |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | ०-०२-० | | | | |
| **नोड-उलवे** | | | | | | | | |
| ४ | करंजाडे-१७८ | करंजाडे ६८/६९ | ९१/१A | ०-४१-० | ३५० चौ. मी. | नोड-करंजाडे सेक्टर क्र.०६, भूखंड क्र.७३, क्षेत्र ३४९.९७ चौ.मी. | **श्री. मधुकर गोपाळ साबळे, श्री. मारुती गोपाळ साबळे, श्री. मुकुंद गोपाळ साबळे व श्रीमती विमल भाऊ पवार (मूळ निवाडाघारक) कै. मंदा शंकर पवार उर्फ उर्मिला लक्ष्मण पवार (मयत) (मृत्यू दि. ०२.०९.२०२१) यांचे वारस (वारस दाखला क्र.** CMA ७५२/२०२३)<br>१. श्री. श्रीधर लक्ष्मण पवार<br>२. श्री. हरेश लक्ष्मण पवार<br>३. सी. हर्षदा पंढरीनाथ उतेकर | सक्षम न्यायालयाने घोषित केलेल्या वारसांपैकी पात्र भूधारक<br>१. श्री. मधुकर गोपाळ साबळे<br>२. श्री. मारुती गोपाळ साबळे<br>३. श्री. मुकुंद गोपाळ साबळे<br>यांच्या नावे भूखंड वाटपाचे प्रस्तावित आहे.<br>**नोंदणीकृत हक्कसोडपत्राची माहिती (सह. दुय्यम निबंधक, पवल४)**<br>पवल४-८१४९/२०१६ पावती क्र. ८९२३, दि.<br>११.०५, २०२६ श्रीमती विमल भाऊ पवार व कै. मंदा शंकर पवार उर्फ उर्मिला लक्ष्मण पवार (मयत) यांचे नारस श्री. श्रीधर लक्ष्मण पवार, श्री. हरेश लक्ष्मण पवार, सौ. हर्षदा पढरीनाथ उतेकर यांनी श्री. मधुकर, श्री. मारुती व श्री.मुकुंद गोपाळ साबळे यांच्या नावे हक्क सोडला आहे. जाहीर सूचना रायगड नगरी, दि.२१.०७.२०२६; हरकत नाही<br>**न्यायालयीन दावे / मनाई हुकूम:**<br>संचिकेत कोणताही दिवाणी वाद अथवा मनाई हुकूम दिसून येत नाही |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | ०-४१-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)
मुख्य भूमी व भूमापन विभाग (१२.५%) सिडको भवन,
तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२९६/२०२६-२७

# रोहित शर्माची दोन विश्वविक्रमांवर नजर

## || अशी कामगिरी करणारा ठरेल पहिलाच फलंदाज || विक्रम अनेक दशकांपर्यंत मोडणे कठीण

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय स्टार फलंदाज रोहित शर्माच्या नावावर आधीच एकदिवसीय क्रिकेटमधील अनेक महत्त्वाचे विक्रम नोंदवलेले आहेत, असे टप्पे जे इतर कोणत्याही खेळाडूसाठी गाठणे सोपे नाही. आता रोहितचे लक्ष आणखी एका मोठ्या कामगिरीवर आहे.

न्यूझीलंड विरुद्धच्या मालिकेतील उर्वरित तीन सामने रोहित शर्मासाठी अत्यंत महत्त्वाचे असणार आहेत. या दौऱ्यावर आतापर्यंत त्याची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. त्यानंतर, भारतीय संघ या वर्षाच्या उत्तरार्धात श्रीलंकेविरुद्ध मायदेशात तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे. अशा प्रकारे, या सहा सामन्यांच्या दरम्यान, रोहितकडे आपल्या नावावर असलेले विक्रम अधिक उंचावण्याची संधी असेल. सध्या रोहित शर्मा एकदिवसीय क्रिकेटमध्ये ४०० षटकारांचा टप्पा गाठण्यापासून केवळ १७ षटकार दूर आहे. जर त्याने न्यूझीलंड विरुद्धच्या उर्वरितसामन्यांत किंवा श्रीलंका विरुद्धच्या आगामी मायदेशातील मालिकेत ही कामगिरी केली, तर तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये ४०० षटकार मारणारा जगातील पहिला फलंदाज ठरेल. विशेष म्हणजे, या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम आधीच रोहितच्या नावावर आहे. याव्यतिरिक्त, रोहितकडे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही मोठा विक्रम प्रस्थापित करण्याची संधी आहे. तो तिन्ही फॉरमॅट मिळून एकूण ७०० षटकार पूर्ण करण्यापासून केवळ २४ षटकार दूर आहे. असे केल्यास, तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७०० षटकार मारणारा पहिला फलंदाज ठरेल.



### ४०० षटकारांचा महत्त्वाचा टप्पा

रोहित शर्माने एकदिवसीय क्रिकेटमध्ये ४०० षटकारांचा टप्पा गाठणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. कारण आजच्या काळात पूर्वीच्या तुलनेत एकदिवसीय सामने कमी खेळले जात होते. परिणामी, कोणत्याही फलंदाजासाठी इतक्या प्रदीर्घ काळापर्यंत एकदिवसीय क्रिकेट खेळून असा टप्पा गाठणे एक मोठे आव्हान असणार आहे. शिवाय, सध्याच्या काळात अनेक खेळाडू टी-२० क्रिकेटला अधिक प्राधान्य देत आहेत. त्यामुळे, रोहितच्या नावावर असलेला हा विक्रम मोडणे कोणत्याही फलंदाजासाठी सोपे नसेल.



# दिल्लीच्या खेळाडूवर गुजरातची नजर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

आयपीएल २०२७ चा लिलाव पुढच्या महिन्यात गोव्यामध्ये होणार आहे. त्याआधी १७ नोव्हेंबरपर्यंत सर्व संघांना संघातून करारमुक्त केले जाणारे खेळाडू आणि संघात कायम केले जाणाऱ्या खेळाडूंची यादी जाहीर करायची आहे. परंतु, त्याआधी खेळाडूंच्या ट्रेडिंगच्या चर्चांना उधाण आले आहे. २०२४ मध्ये पंजाब किंग्सकडून पदार्पण केलेल्या आशुतोष शर्माने गेले दोन हंगाम दिल्लीसाठी खेळले असून, त्याने फिनिशर म्हणून त्याची प्रतिभा दाखवून दिली आहे. तो गरज पडल्यास गोलंदाजीतही योगदान देऊ शकतो. मिळालेल्या माहितीनुसार, गुजरात टायटन्सने दोन महिन्यांपूर्वीच आशुतोषसाठी दिल्ली कॅपिटल्सशी संपर्क साधला आहे. परंतु, त्यांना दिल्लीकडून त्वरित प्रतिसाद मिळाला नाही. मात्र, आता दिल्लीचे मॅनेजमेंट बदलले असून, नवे मॅनेजमेंट या ऑफरचा पुन्हा विचार करण्याची शक्यता आहे. आशुतोषने यापूर्वी पंजाब किंग्ससाठी आणि दिल्ली कॅपिटल्ससाठी कठीण परिस्थितीतूनही अनेकदा सामने जिंकून दिले आहेत.

## स्वरुपच्या दोन शतकी भागीदाऱ्या

**| मुंबई | प्रतिनिधी |**

स्वरुप राऊतच्या नाबाद १७७ धावांमुळे शिवाजी पार्क जिमखान्याने अजित नाईक स्मृती १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेतील आपल्या उपांत्यपूर्व लढतीत भक्कम सुरुवात केली. स्वरुपने दोन शतकी भागीदाऱ्या केल्यामुळे शिवाजी पार्क जिमखान्याने वरळी स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या या स्पर्धेतील अंजुमन इस्लाम इन्स्टिट्यूटविरुद्धच्या लढतीत सोमवारी पहिल्या दिवसअखेर २ बाद ३६४ अशी भक्कम धावसंख्या उभारली. या स्पर्धेतील शिवाजी पार्क जिमखान्यावरील लढतीचा पहिल्या दिवसाचा हिरो स्वरुप होता. त्याने १७७ धावांची नाबाद खेळी करताना सुरुवातीस आरिष खानसह १५७ चेंडूंत ११३ धावांची भक्कम भागीदारी केली. त्यानंतर स्वरुपने हार्दिक गोवारीच्या साथीत १९९ धावांचा चोप दिला. आदर्श जैसवारने अवघ्या ३२ धावांत सहा फलंदाज बाद केले. त्यामुळे वरळी स्पोर्ट्स क्लबने एम. व्ही. स्पोर्ट्स क्लबला १९३ धावांत रोखले. स्वराज मोरे आणि राजवीर काशीदच्या अचूक गोलंदाजीमुळे सोव्हेनियरने व्हिक्टरीचा डाव १९४ धावांत संपवला. त्यानंतर सोव्हेनियरने बिनबाद ५२ अशी भक्कम सुरुवात केली आहे.



# स्पोर्टस् कॉम्प्लेक्सवरून वातावरण तापले

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबई शहरात महापालिकेच्या माध्यमातून वाशी येथील प्रस्तावित असलेल्या स्पोर्टस् कॉम्प्लेक्सच्या प्रकल्पावरून राजकीय वातावरण तापले आहे. वाशी येथील सेक्टर १० मधील भूखंडावर इंडोर स्टेडियम आणि स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्यात यावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, अशी माहिती नगरसेविका सोनवी लाड यांनी दिली. वाशी येथे रविवारी (दि.९) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

त्यापुढे म्हणाल्या की, नवी मुंबईत होणाऱ्या रेसिंग कारसाठी करोड रुपये खर्च केले जातात; परंतु, त्यातून नवी मुंबई महानगरपालिकेला कोणताही फायदा होणार नाही. मात्र, स्थानिक राज्यकर्ते या वाशी येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला का विरोध करत आहेत, असा सवाल त्यांनी केला. तसेच, वाशी आणि परिसरामध्ये अनेक नामांकित शाळा, कॉलेज आणि शिक्षण संस्था असूनही येथील मुलांना हक्काचे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उपलब्ध नाही. संबंधित प्रकल्पाचा प्रस्ताव स्थायी समितीत नामंजूर करून लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम सत्ताधारी पक्षाकडून केले गेल्याच्या गंभीर आरोपही त्यांनी केला. तसेच, काही मिनिटांतच स्थायी समितीच्या बैठकीत करोडो रुपयांचे प्रस्ताव मंजूर केले जात असल्याचा संताप देखील व्यक्त करण्यात आला. जर येत्या १५ दिवसांत या प्रस्तावात सकारात्मक निर्णय झाला नाही, तर सर्वपक्षीय तीव्र आंदोलनासह कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा देखील सोनवी लाड यांनी दिला.



- नगरसेविका सोनवी लाड आक्रमक
- आंदोलनासह कायदेशीर कारवाईच इशारा

# महाजनेतील मैदानात रंगली स्पर्धा

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

श्री महाजनाई स्पोर्टस् क्लबच्यावतीने अलिबाग तालुक्यातील महाजने येथील मैदानात शनिवारी (दि.७) विद्यूत प्रकाश झोतात नाईट अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आग्रावमधील निनाद स्पोर्टस् संघ अंतिम विजेता ठरला.

गतवर्षी प्रमाणे यावर्षी दिवाळीच्या निमित्ताने शनिवारी सायंकाळी महाजने येथील मर्यादीत षटकांचे नाईट अंडरआर्म क्रिकेट स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत ३० हून अधिक संघाने सहभाग घेतला होता. रात्रभर होणाऱ्या या क्रिकेट स्पर्धेचा आनंद क्रीडाप्रेमींनी मनमुरादपणे लुटला. अखेर दुसऱ्या दिवशी रविवारी (दि.८) सकाळी आग्राव येथील निनाद स्पोर्टस् आणि बेलोशी येथील राजन स्पोर्टस् या दोन संघामध्ये अंतिम लढत झाली. यामध्ये निनाद स्पोर्टस् संघाने बाजी मारली.

### निनाद स्पोर्ट्स आग्राव संघाची बाजी



या संघाला विलास भोनकर, विनायक भोनकर, संजय पारंगे, शशीकांत पाटील, राजाराम पारंगे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रकाश पारंगे, तुषार गुंड, अरविंद पाटील, क्लबचे सर्व पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ, तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. बेलेशी येथील राजन स्पोर्टस् संघाला द्वीतीय क्रमांकाचे, आग्रावमधील वर्णका स्पोर्टस् संघाला तृतीय आणि राजेवाडी येथील संघाला चतुर्थ क्रमांकाचे चषक देऊन सन्मानित करण्यात आले आहे. तसेच, आग्राव संघातील राज पाटील या खेळाडुला उत्कृष्ट गोलंदाज, तर सिद्धेश भगत या खेळाडूला उत्कृष्ट फलंदाज म्हणून गौरविण्यात आले. तसेच, बेलोशीमधील निनाद वारगे या खेळाडूला मालिकावीर हा बहुमान देऊन सन्मानित करण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी श्री महाजनाई स्पोर्टस् क्लबच्या पदाधिकारी, सभासद, तरुणाईसह ज्येष्ठ मंडळींनी प्रचंड मेहनत घेतली.

## राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबईतील बॉम्बे जिमखाना येथे दि.१२ ते १५ नोव्हेंबरदरम्यान महाराष्ट्र ओपन राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. या चार दिवसीय स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील उदयोन्मुख आणि अनुभवी बॅडमिंटन खेळाडू एकमेकांशी भिडणार आहेत. या स्पर्धेसाठी ३५० हून अधिक प्रवेशिका प्राप्त झाल्या असून, कनिष्ठ आणि खुला अशा विविध गटांत एकूण १२ प्रकारांत सामने खेळवले जाणार आहेत. यावरून महाराष्ट्रातील बॅडमिंटन खेळाडूंच्या प्रतिभेची व्याप्ती दिसून येईल. कनिष्ठ गटात १७ आणि १९ वर्षांखालील वयोगटांतील मुला-मुलींच्या एकेरी व दुहेरी स्पर्धांचा समावेश आहे. तर, खुल्या गटात पुरुष एकेरी, महिला एकेरी, पुरुष दुहेरी आणि मिश्र दुहेरी प्रकारांतील सामने होणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.



## हार्दिकचे जाणे मुंबईसाठी फायद्याचेच

**| मुंबई | प्रतिनिधी |**

आयपीएल २०२७ च्या लिलावाच्या पार्श्वभूमीवर सध्या ट्रेडचा विषय जोरात सुरू आहे. नुकतेच चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात चार खेळाडूंची अदलाबदल झाली. त्यातच हार्दिक पांड्याच्या ट्रेडबाबत रोज काहींना काही नवी अपडेट समोर येते. आता तो पंजाब किंग्जमध्ये सामील होणार आहे, अशी माहिती समोर येत आहे.

हार्दिक मुंबई इंडियन्स सोडून पंजाब किंग्जमध्ये सामील होत आहे, तर अर्शदीप मुंबई इंडियन्समध्ये दाखल होत आहे. त्यांच्या ट्रेडबाबतची कागदपत्रे बीसीसीआयकडे जमा करण्यात आल्याचे समोर आले. याबद्दल मात्र अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. तरी हार्दिकच्या जाण्याने एमआयला फायदा होणार की नुकसान याचे विश्लेषण सुरू झाले असून, भारताच्या माजी क्रिकेटपटूने हार्दिकच्या जाण्याने एमआयला फायदा होईल, असे वक्तव्य केले आहे. माजी भारतीय क्रिकेटपटू आकाश चोप्रा यांनी त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर हार्दिक-अर्शदीपच्या ट्रेडबाबत वक्तव्य केले आहे. त्यांनी सांगितले की, अर्शदीपच्या आगमनाने मुंबई इंडिन्सची गोलंदाजी फळी आणखी मजबूत होईल. अर्शदीप आणि जसप्रीत बुमरा, हे दोघेही भारताच्या टी-२० संघाचे प्रमुख गोलंदाज आहेत. त्यांच्या एकत्रित येण्याने मुंबईला अधिक बळ मिळेल.

**बॅडमिंटनपटूंचा तेलंगणात ट्रिमल धमाका** | **एकेरीतील दोन्ही विजेतेपद पटकावले**

# आंतरराष्ट्रीय कोर्टवर भारताची ताकद

**| मुंबई | प्रतिनिधी |**

आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनच्या कोर्टवर रविवारी (दि.८) भारतीय खेळाडूंनी आपली ताकद दाखवून दिली. 'तेलंगणा इंडिया इंटरनॅशनल चॅलेंज २०२६' स्पर्धेत पुरुष आणि महिला एकेरीची दोन्ही विजेतेपद भारताच्या खेळाडूंनी पटकावली आहेत. विशेष म्हणजे पाचपैकी तीन विजेतेपदे जिंकत भारताने ट्रिपल धमाका केला आहे.

पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत सहाव्या मानांकित तुषार सुवीरने सहकारी भारत राघववर मात करत विजेतेपदाला गवसणी घातली; मात्र, हा विजय सहज नव्हता. पहिला डाव १५-२१ असा गमावल्यानंतर तुषारसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते; परंतु, दुसऱ्या डावात त्याने खेळाची दिशा बदलली. कोर्टवरील वेग, अचूक स्मॅश आणि प्रतिस्पर्ध्याच्या हालचालींचा अंदाज घेत त्याने २१-१८ असा डाव जिंकत बरोबरी साधली. निर्णायक तिसऱ्या डावात दोन्ही खेळाडूंनी विजयासाठी जोरदार प्रयत्न केले; मात्र, तुषारने २१-१९ अशी बाजी मारत १५-२१, २१-१८, २१-१९ अशा तीन डावांत सामना जिंकला. दरम्यान, पहिला डाव गमावल्यानंतर पुनरागमन करून विजेतेपद मिळवण्याची त्याची कामगिरी विशेष लक्षवेधी ठरली. महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात अव्वल मानांकित रक्षित रामराजने नवव्या मानांकित रुजुला रामूचा १६-२१, २१-१५, २१-१४ असा पराभव केला. तिनेही पहिला डाव गमावल्यानंतर अप्रतिम पुनरागमन केले. त्यामुळे पुरुष आणि महिला दोन्ही एकेरीच्या अंतिम सामन्यांत भारतीय खेळाडूंनी सुरुवातीचा धक्का पचवून विजेतेपद मिळवले, हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले.

पुरुष दुहेरीत पृष्णा प्रसाद गरगा आणि पृथ्वी पृष्णमूर्ती रॉय या अव्वल मानांकित जोडीने साई प्रतीक के आणि रुबन पुमार रेतिनासबापथी यांच्यावर २१-१२, २१-१८ अशी सरळ डावात मात केली. त्यामुळे भारताला तिसरे विजेतेपद मिळाले. मिश्र दुहेरीत सतीश पुमार करुणाकरन आणि अश्विनी पोनप्पा यांना रशियाच्या रोडियन अलीमोव आणि अलीना डेव्हलेटोव्हा यांच्याकडून १९-२१, २१-११, २१-१३ असा पराभव स्वीकारावा लागला. महिला दुहेरीचे विजेतेपद जपानच्या मेई सुदो आणि माई तानाबे यांनी जिंकले.



## न्यूझीलंड संघाला दुखापतीचे ग्रहण

**हॅमिल्टन :** न्यूझीलंड संघामागच्या अडचणी काही केल्या कमी होताना दिसत नाही. आतापर्यंत एकदिवसीय मालिकेतून त्यांच्या ६ खेळाडूंना दुखापतीमुळे माघार घ्यावी लागली असताना तिसऱ्या एकदिवसीय मालिकेपूर्वी आणखी दोन मोठे धक्के बसले आहेत. प्रमुख गोलंदाज लॉकी फर्ग्युसन हा अद्याप दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नाही आणि त्यामुळे तो शेवटच्या दोन सामन्यांना मुकणार आहे. त्यात आयसीसीच्या नियामामुळे गोलंदाज ब्लेअर टिकनर याला पुढील दोन सामने खेळता येणार नाही. टी-२० सामन्यांदरम्यान झालेल्या उजव्या पोटरीच्या किरकोळ दुखापतीतून फर्ग्युसन पूर्णपणे बरा झालेला नाही. दुसरीकडे दुसऱ्या एकदिवसीय मालिकेतील सामन्यात टिकनरच्या डोक्यावर चेंडू आदळला होता आणि मॅट फिशर कन्कशन सबस्टीट्यूड म्हणून त्याच्याजागी मैदानावर उतरला होता. मात्र, टिकनरच्या डोक्याला मार लागला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. परंतु, तो आयसीसीच्या सात दिवसांच्या विश्रांतीच्या कालावधीतून जाणार असल्याने, पुढील दोन सामन्यांमधून बाहेर राहील. शेवटच्या दोन एकदिवसीय मालिकेतील सामन्यांसाठी संघात निवड झालेल्या गोलंदाजी अष्टपैलू क्रिस्टियन क्लार्कला आता हॅमिल्टन येथे होणाऱ्या तिसऱ्या सामन्यापूर्वी टिकनरला पर्याय म्हणून संघात बोलावण्यात आले आहे. दुसरीकडे, मालिकेपूर्वी डेव्हन कॉनवेसोबत झालेल्या धडकेनंतर मॅट हेन्रीला माउंट मौंगानुई येथे होणाऱ्या चौथ्या एकदिवसीय मालिकेतील सामन्यात पुनरागमन करण्याचे लक्ष्य ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. हेन्रीला दुसऱ्या टी-२० सामन्यादरम्यान त्याच्या उजव्या मांडीच्या स्नायूला (क्वाड्रिसेप्स) किरकोळ दुखापत झाली होती आणि कॉनवेसोबतच्या धडकेत डोक्याला गंभीर दुखापत (कन्कशन) नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## विकमासाठी केवळ २२ धावांची गरज

**नवी दिल्ली :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सध्या पाच सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू असून, भारत २-० ने आघाडीवर आहे. तिसरा एकदिवसीय सामना मंगळवारी हॅमिल्टन येथे खेळवला जाणार आहे. या सामन्यात विजय मिळवून मालिकेत निर्णायक आघाडी घेण्याचे भारताचे लक्ष्य असणार आहे. तसेच, सर्वांचे लक्ष पुन्हा एकदा भारतीय सुपरस्टार फलंदाज विराट कोहलीवर असणार आहे. ऑकलंडमधील पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याने ५१ चेंडूंत ७४ धावांची उत्कृष्ट खेळी केली होती. मात्र, वेलिंग्टनमध्ये झालेल्या दुसऱ्या सामन्यात त्याला विशेष प्रभाव पाडता आला नाही. आता हॅमिल्टनमध्ये कोहली आपली मागील कामगिरी सुधारण्याचा प्रयत्न करताना दिसेल. कोहली इतिहास घडवण्याच्या उंबरठ्यावर आहे. तो न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये २००० धावा पूर्ण करणारा पहिला खेळाडू ठरू शकतो. हा टप्पा गाठण्यासाठी त्याला तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात केवळ २२ धावांची गरज आहे. आतापर्यंत कोहलीने न्यूझीलंडविरुद्ध ३८ एकदिवसीय सामने खेळले असून, ५६.५१ च्या सरासरीने १९७८ धावा केल्या आहेत. त्यात ७ शतके आणि ११ अर्धशतकांचा समावेश आहे. न्यूझीलंडविरुद्ध सर्वाधिक एकदिवसीय धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार आणि दिग्गज फलंदाज रिकी पॉंटिंग दुसऱ्या क्रमांकावर आहेत. त्यांनी ५१ सामन्यांत ४५.८३ च्या सरासरीने १९७१ धावा केल्या आहेत. महान फलंदाज सचिन तेंडुलकर या यादीत तिसऱ्या क्रमांकावर असून, त्यांनी न्यूझीलंडविरुद्ध ४२ एकदिवसीय सामन्यांत ४६.०५ च्या सरासरीने १७५० धावा केल्या आहेत.



## पाच खेळाडू संघाची साथ सोडणार

**नवी दिल्ली :** भारत-न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेतील तिसरा सामना मंगळवारी (दि.१०) हॅमिल्टन येथे होणार आहे. परंतु, हॅमिल्टन येथे सोमवारी मुसळधार पाऊस पडल्याने भारतीय खेळाडूंना सराव करता आला नाही. मंगळवारीही पावसाची शक्यता असल्याने सामन्यावरच प्रश्नचिन्ह आहे. मात्र, या सामन्यानंतर भारताचे पाच खेळाडू एकदिवसीय संघाची साथ सोडणार आहेत. त्यामुळे शेवटच्या दोन एकदिवसीय सामन्यासाठी भारताच्या संघात बदल पाहायला मिळणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल, लोकेश राहुल व अंशुल कंबोज यांची एकदिवसीय मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांसाठीच निवड झाली होती. कुलदीप यादव आणि मोहम्मद सिराज हे पाचही सामन्यासाठीच्या संघाचे सदस्य आहेत. परंतु, गिल, राहुल व कंबोज हे उर्वरित दोन एकदिवसीय सामन्यात खेळणार नाहीत, तर सिराज व कुलदीप हेही दि.१३ व १५ नोव्हेंबरला होणाऱ्या सामन्यात खेळण्याची शक्यता कमीच आहे.

## राजस्थान, लखनऊ ट्रेड डीलची चर्चा

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२७ साठी ट्रेड विंडो खुली आहे. या नियमाद्वारे अनेक मोठ्या खेळाडूंची अदला-बदली झाली आहे. आयपीएल २०२७ च्या लिलावापूर्वी आतापर्यंत आठ ट्रेड डील्स पूर्ण झाल्या आहेत, तर काही मोठ्या डील्स होणे अजून बाकी आहे. मुंबई इंडियन्सकडून हार्दिक पांड्या पंजाब किंग्समध्ये जाईल, तर त्याच्या जागी अर्शदीप सिंग पंजाबकडून मुंबईत येईल. या डीलवर शिक्कामोर्तब झाले असून, याची अधिकृत घोषणा होणे अद्याप बाकी आहे. आता आणखी एक मोठी ट्रेड डील समोर आली आहे. यशस्वी जयस्वाल राजस्थान रॉयल्सची साथ सोडून लखनऊ सुपर जायंट्समध्ये सामील होईल. तर, लखनऊकडून निकोलस पूरन किंवा जोश इंग्लिस राजस्थानमध्ये येतील. अशा प्रकारे लखनऊ आणि राजस्थान दरम्यान तीन खेळाडूंची अदला-बदली होईल. मात्र, दोन्ही फ्रँचायझींकडून याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)